# अस्मा-उल-हुस्ना

## (अल्लाहची गुणात्मक नावे)

लेखक

**सय्यद अबुल आला मौदूदी**

अनुवाद

**अ. ह. अन्सारी**

# अनुक्रमणिका

| तपसील | | पृ.क्र. |
|---|---|---|
| प्रस्तावना | | ०८ |
| अल अस्मा-उल-हुस्ना | | ०९ |
| अतिरिक्त नावे | | १३ |
| १. अल्लाहु | : अल-इलाह | १४ |
| २. अर्रहमान | : महाकृपाळू | १४ |
| ३. अर्रहीम | : दयावान | १४ |
| ४. अल्-मलिकु | : सम्राट, राजा | १५ |
| ५. अल्-कुद्दूसु | : महापवित्र | १५ |
| ६. अस्-सलामु | : महाकल्याणकारी | १५ |
| ७. अल्-मोमिनु | : महाविश्वासू | १६ |
| ८. अल्-मुहैमिनु | : रक्षक | १६ |
| ९. अल्-अजीजु | : महाप्रिय | १६ |
| १०.अल्-जब्बारु | : महाशक्तिमान, निर्णय लादणारा | १७ |
| ११.अल्-मुतकब्बिरु | : नेहमी अतिमहान राहणारा | १७ |
| १२.अल्-खालिकु | : सृष्टीरचनेचे नियोजन करणारा | १७ |
| १३.अल्-बारीअु | : योजनेची अंमलबजावणी करणारा | १८ |
| १४.अल्-मुसव्विरु | : योजनेनुसार चित्रकारी करणारा | १८ |
| १५.अल्-ग़फ़्फ़ारु | : क्षमाशील, अपराध क्षमा करणारा | १९ |
| १६.अल्-क़ह्हारु | : सर्वांवर प्रभुत्वशाली, पूर्ण अधिकारी | १९ |
| १७.अल्-वह्हाबु | : महादाता, खरा दानशूर | २० |
| १८.अल्-रज़्ज़ाकु | : सगळ्यांची जीविका देणारा | २० |
| १९.अल्-फत्ताहु | : शक्तिशाली अधिकारी | २० |
| २०.अल्-अ़लीमु | : सर्व काही जाणणारा | २१ |

२१.अल्-काबिज़ु : घटविणारा व काबीज करणारा २२
२२.अल्-नासितु : विस्तृत करणारा २२
२३.अल्-ख़ाफ़िज़ु : पाडणारा २३
२४. अल्-राफिअु : उंच करणारा, उचलणारा २३
२५. अल्-मुइज़्ज़ु : प्रतिष्ठा प्रदान करणारा २४
२६. अल्-मुज़िल्लु : तिरस्कृत करणारा २४
२७. अल्-समीअु : सर्व काही ऐकणारा २४
२८. अल्-बसीरु : सर्व काही पाहणारा २५
२९. अल्-हकमु : निर्णय घेणारा २५
३०. अल्-अ़दलु : न्याय करणारा २६
३१. अल्-लतीफु : गुप्त सत्य जाणणारा २६
३२. अल्-खबीरु : अत्यंत सचेत अल्लाह २७
३३. अल्-हलीमु : महासहनशील, उदार २७
३४. अल्-अजीमु : महान अस्तित्व असणारा २८
३५. अल्-गफूरु : क्षमावान, क्षमाशील. २८
३६. अल्-शकूरु : कद्रदान, गुणज्ञाता २९
३७. अल्-अलिय्यु : उच्चतर अधिकारी, प्रभुत्चशाली २९
३८. अल्-कबीरु : ज्येष्ठ ३०
३९. अल्-हफीज़ु : प्रत्येक गोष्टीची निगराणी करणारा ३०
४०. अल्-मुकीतु : ईश्वरीय शक्ती, नजर ठेवणारा ३१
४१. अल्-हसीबु : हिशेबनीस ३१
४२. अल्-जलीलु : महान, मोठा, बुजुर्ग ३२
४३. अल्-करीमु : दया-कृपा करणारा ३२
४४. अल्-रकीबु : पाळत ठेवणारा ३२
४५. अल्-मुजीबु : स्वीकारकर्ता, उत्तरदायी ३३
४६. अल्-वासिअु : विशाल व व्यापक दृष्टी ठेवणारा ३३
४७. अल्-हकीमु : अतिज्ञानी, विद्वान ३४
४८. अल्-वदूदु : अतिप्रेमळ ३५

| | | | |
|---|---|---|---|
| ४९. | अल्-मजीदु | : श्रेष्ठ, उत्तम, महान | ३५ |
| ५०. | अल्-बाअिसु | : पाठवणारा व जिवंत करणारा | ३५ |
| ५१. | अल्-शहीदु | : साक्षी | ३६ |
| ५२. | अल्-हक्कु | : सत्य, खरा, उचित | ३७ |
| ५३. | अल्-वकीलु | : प्रतिनिधी | ३८ |
| ५४. | अल्-क़वीय्यु | : शक्तिशाली व बलशाली | ३८ |
| ५५. | अल्-मतीनु | : अविचलित, सामर्थ्यवान | ३९ |
| ५६. | अल्-वलीय्यु | : मित्र, प्रबंधक, सहाय्यक, सांभाळणारा | ३९ |
| ५७. | अल्-हमीदु | : स्तुत्य, विशेषता धारण करणारा | ४० |
| ५८. | अल्-मोहसियु | : गणना करुन ठेवणारा | ४० |
| ५९. | अल्-मुबदियु | : सुरुवातीला निर्माण करणारा | ४० |
| ६०. | अल्-मुईदु | : दुसऱ्यांदा जिवंत करणारा | ४१ |
| ६१. | अल्-मोहई | : जीवन-दाई | ४१ |
| ६२. | अल्-मोमिनु | : मृत्युदाता | ४१ |
| ६३. | अल्-हैय्यु | : जिवंत, अमर, अस्तित्व | ४२ |
| ६४. | अल्-क़य्यूमु | : स्वतःच्या शक्तीने कायम राहणारा | ४२ |
| ६५. | अल्-वाजिदु | : अस्तित्व देणारा | ४२ |
| ६६. | अल्-माजिदु | : श्रेष्ठ, उत्तम, महान | ४३ |
| ६७. | अल्-वाहिदु | : एकमेव, अद्वितीय | ४३ |
| ६८. | अल्-समदु | : निरपेक्ष | ४४ |
| ६९. | अल्-क़ादिरु | : पूर्ण सामर्थ्यवान | ४४ |
| ७०. | अल्-मुक्तदिरु | : ईश्वरी शक्तीचा | ४५ |
| ७१. | अल्-मुकद्दिमु | : पूर्वीच सचेत करणारा | ४५ |
| ७२. | अल्-मुआख्खिरु | : वेळ देणारा | ४६ |
| ७३. | अल्-अव्वलु | : सगळ्यांत प्रथम | ४६ |
| ७४. | अल्-आख़िरु | : सगळ्यांत शेवटचा | ४७ |
| ७५. | अल्-ज़ाहिरु | : प्रखरपणे प्रगट | ४७ |

| | | |
|---|---|---|
| ७६. अल्-बातिनू | : अतिगुप्त | ४७ |
| ७७. अल्-वालिअु | : समर्थक व मदतगार | ४८ |
| ७८. अल्-मुतआलियु | : श्रेष्ठतम | ४८ |
| ७९. अल्-बऱ्रो | : महान उपकारी | ४८ |
| ८०. अल्-तव्वाबु | : माफी स्वीकारणारा, माफी देणारा | ४९ |
| ८१. अल्-मुन्तकिमु | : प्रतिशोध घेणारा | ४९ |
| ८२. अल्-अफ़ुव्वु | : माफ करणारा | ५० |
| ८३. अल्-रऊफ़ु | : प्रेमळ, माफ करणारा | ५० |
| ८४. अल्-मालिकुल-मुल्क | : जगतस्वामी | ५१ |
| ८५. ज़ुल-जलालि वल-इकरामु | : महान व दानशील | ५१ |
| ८६. अल्-मुकसितु | : न्याय देणारा | ५१ |
| ८७. अल्-जमिऊ | : एकत्र करणारा | ५१ |
| ८८. अल्-ग़नीय्यु | : स्वसंपन्न (स्वयंसिद्ध) | ५२ |
| ८९. अल्-मुग़ानियु | : लालसारहित (बेनियाज़) | ५२ |
| ९०. अल्-मानिअु | : अल्लाह रोखणार तर देणार कोण? | ५३ |
| ९१. अल्-ज़ाऱ्रो | : हानीचा मालक | ५३ |
| ९२. अल्-नाफिअु | : नफा देणारा | ५३ |
| ९३. अल्-नुरु | : साऱ्या विश्वाचे तेज | ५४ |
| ९४. अल्-हादियु | : मार्गदर्शक | ५४ |
| ९५. अल्-बदीओ | : आकाश व पृथ्वीचा अविष्कारक | ५५ |
| ९६. अल्-बाक़िओ | : बाकी असणारा | ५६ |
| ९७. अल्-वारिसु | : खरा वारसदार | ५६ |
| ९८. अल्-रशीदु | : मार्गदर्शक | ५७ |
| ९९. अल्-सबूरु | : धैर्यवान व संतोषी | ५७ |

| | | |
|---|---|---|
| अल्लाहची काही अतिरिक्त नावे | | ५८ |
| १. अर्-रब | : स्वामी, पालनहार, शासक | ५८ |
| २. अल्-काफियु | : पर्याप्त असणारा | ५८ |
| ३. अल्-फातिरु | : सृष्टी रचयिता | ५९ |
| ४. अल्-शदीदु | : कठोर शिक्षा करणारा | ५९ |
| ५. अल्-क़रीबु | : अतिजवळ असणारा | ५९ |
| ६. अल्-मुग़ीसु | : सहाय्यता करणारा | ६० |
| ७. अल्-काश्मु | : न्यायाचा शासक | ६० |
| ८. अल्-मन्नानु | : कृतज्ञ अल्लाह | ६० |
| ९. अल्-कफ़िलु | : जामीन | ६१ |
| १०.अर्-रफीअु | : उच्चतम श्रेणीचा | ६१ |
| ११.अल्-मुहीतु | :व्यापक, सर्व शक्तीनिशी घेरणारा | ६१ |
| १२.अल्-नसीरु | : मदत करणारा | ६२ |
| १३. ज़ुत-तौलि | : महान, कृपाळू, दयावान, उदार | ६२ |
| १४.अल्-मुबीनु | : स्पष्टवादी, असंदिग्ध अल्लाह | ६२ |
| १५.अस-सरीअ़ु | : तात्काळ हिशेब घेणारा | ६२ |
| १६.अल्-मुअ़ीनु | : समर्थक, सहाय्यक | ६३ |
| १७.अल्-ग़ालिबु | : प्रभुत्व राखणारा | ६३ |
| १८.अल्-हफ़िय्यु | : अति मेहेरबान | ६४ |
| १९.अल्-काबिलु | : पश्चात्ताप स्वीकृत करणारा | ६४ |

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

# प्रस्तावना

पैगंबर मुहम्मद (स.) कथनात अल्लाहची नव्याणनव पवित्र नावे कथन केलेली आहेत. अल्लाहची आठवण करायची असल्यास योग्य व उचित नावेच उच्चारली जावीत जी फक्त अल्लाहसाठीच आहेत. ही नावे सन्मानपूर्वक व आदराने घ्यावीत. थट्टा-मस्करीत व अपवित्र ठिकाणी ती घेतली जाऊ नयेत. मनापासून शब्दाचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. नाही तर पुण्य मिळण्यापेक्षा पापाचे धनी होणार. ईश्वराची महिमा, प्रतिष्ठा, गौरव, वैभवही अल्लाहने नेमून दिलेल्या शब्दांतच आहे. हे शब्द मनुष्य-निर्मित नाही. या नावांत माणसाने काही कमी-जास्त बदल करता कामा नये.

आम्ही प्रार्थना करतो की वाचकांना योग्य पथदर्शन लाभो. लेखकाला, अनुवादक व प्रसिद्ध करणाऱ्यांना परलोकात अल्लाह फळ देवो. आमीन.

# अल अस्मा-उल-हुस्ना

“हे पैगंबर (स.)! यांना सांगा, अल्लाह म्हणून साद घाला अथवा कृपावंत म्हणून,ज्या नावानेदेखील तुम्ही साद घालाल त्याच्याकरिता सर्व चांगलीच नावे आहेत.” *(दिव्य कुरआन : १७-११०)*

वरील संधर्मीय कुरआन आयतीबाबत पैगंबरांच्या यथोचित वचनाने हे नक्की केले आहे की अल्लाहची अशी नव्यानऊ नावे आहेत ज्यांना पाठ करुन माणसाला स्वर्गात जाता येते. सही बुखारी (पैगंबर वचनांचे प्रसिद्ध पुस्तक) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे माननीय अबू हुरैरा (रजि.) कथन करतात की पैगंबर (स.) फर्मावतात की,

“यांत शंका नाही की अल्लाहची नव्याणव नावे (म्हणजेच शंभरात एक कमी) ज्यांनी पाठ केली तो स्वर्गात दाखल झाला. पैगंबरांचे अनुयायी सांगतात, ‘आम्ही मोजून सर्व नावे पाठ केलीत.”

तीन प्रकारची वर्णने (रिवायत) विख्यात आहेत. त्यांतील इमाम तिर्मिजी चे वर्णन सगळ्यात जास्त प्रसिद्ध आहे व त्याला ‘तरीके सफवान बिन सालेह’ म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| १. | हुअल-लाहुल-लज़ी | |
| | लाइलाहा इल्लाहु | : अल्लाहखेरीज दुसरा कोणीही उपास्य नाही. |
| २. | अर्रहमान | : महाकृपाळू |
| ३. | अर्रहीम | : दयावान |
| ४. | अल्-मलिकु | : सम्राट, राजा |
| ५. | अत्-कुद्दूसु | : महापवित्र |
| ६. | अस्-सलामु | : महाकल्याणकारी |
| ७. | अल्-मोमिनु | : महाविश्वासू |
| ८. | अल्-मुहैमिनु | : रक्षक |
| ९. | अल्-अजीजु | : महाप्रिय |
| १०. | अल्-जब्बारु | : महाशक्तिमान, निर्णय लादणारा |
| ११. | अल्-मुतकब्बिरु | : नेहमी अतिमहान राहणारा |
| १२. | अल्-खालिकु | : सृष्टीरचनेचे नियोजन करणारा |
| १३. | अल्-बारीअु | : योजनेची अंमलबजावणी करणारा |
| १४. | अल्-मुसव्विरु | : योजनेनुसार चित्रकारी करणारा |

| | |
|---|---|
| १५. अल्-गफ़्फ़ारु | : क्षमाशील, अपराध क्षमा करणारा |
| १६. अल्-क़ह्हारु | : सर्वांवर प्रभुत्वशाली, पूर्ण अधिकारी |
| १७. अल्-वह्हाबु | : महादाता, खरा दानशूर |
| १८. अल्-रज़्ज़ाकु | : सगळ्यांची जीविका देणारा |
| १९. अल्-फत्ताहु | : शक्तिशाली अधिकारी |
| २०. अल्-अ़लीमु | : सर्व काही जाणणारा |
| २१. अल्-काबिज़ु | : घटविणारा व काबीज करणारा |
| २२. अल्-नासितु | : विस्तृत करणारा |
| २३. अल्-ख़ाफ़िज़ु | : पाडणारा |
| २४. अल्-राफिअु | : उंच करणारा, उचलणारा |
| २५. अल्-मुइज़्ज़ु | : प्रतिष्ठा प्रदान करणारा |
| २६. अल्-मुज़िल्लु | : तिरस्कृत करणारा |
| २७. अल्-समीअु | : सर्व काही ऐकणारा |
| २८. अल्-बसीरु | : सर्व काही पाहणारा |
| २९. अल्-हकमु | : निर्णय घेणारा |
| ३०. अल्-अ़दलु | : न्याय करणारा |
| ३१. अल्-लतीफु | : गुप्त सत्य जाणणारा |
| ३२. अल्-खबीरु | : अत्यंत सचेत अल्लाह |
| ३३. अल्-हलीमु | : महासहनशील, उदार |
| ३४. अल्-अजीमु | : महान अस्तित्व असणारा |
| ३५. अल्-गफ़ूरु | : क्षमावान, क्षमाशील. |
| ३६. अल्-शकूरु | : कद्रदान, गुणज्ञाता |
| ३७. अल्-अलिय्यु | : उच्चतर अधिकारी, प्रभुत्चशाली |
| ३८. अल्-कबीरु | : ज्येष्ठ |
| ३९. अल्-हफीजु | : प्रत्येक गोष्टीची निगराणी करणारा |
| ४०. अल्-मुकीतु | : ईश्वरीय शक्ती, नजर ठेवणारा |
| ४१. अल्-हसीबु | : हिशेबनीस |
| ४२. अल्-जलीलु | : महान, मोठा, बुजुर्ग |
| ४३. अल्-करीमु | : दया-कृपा करणारा |
| ४४. अल्-रकीबु | : पाळत ठेवणारा |

४५. अल्-मुजीबु : स्वीकारकर्ता, उत्तरदायी
४६. अल्-वासिअु : विशाल व व्यापक दृष्टी ठेवणारा
४७. अल्-हकीमु : अतिज्ञानी, विद्वान
४८. अल्-वदूदु : अतिप्रेमळ
४९. अल्-मजीदु : श्रेष्ठ, उत्तम, महान
५०. अल्-बाअिसु : पाठवणारा व जिवंत करणारा
५१. अल्-शहीदु : साक्षी
५२. अल्-हक्कु : सत्य, खरा, उचित
५३. अल्-वकीलु : प्रतिनिधी
५४. अल्-क़वीय्यु : शक्तिशाली व बलशाली
५५. अल्-मतीनु : अविचलित, सामर्थ्यवान
५६. अल्-वलीय्यु : मित्र, प्रबंधक, सहाय्यक, सांभाळणारा
५७. अल्-हमीदु : स्तुत्य, विशेषता धारण करणारा
५८. अल्-मोहसियु : गणना करुन ठेवणारा
५९. अल्-मुबदियु : सुरुवातीला निर्माण करणारा
६०. अल्-मुईदु : दुसऱ्यांदा जिवंत करणारा
६१. अल्-मोहई : जीवन-दाई
६२. अल्-मोमिनु : मृत्युदाता
६३. अल्-हैय्यु : जिवंत, अमर, अस्तित्व
६४. अल्-क़य्यूमु : स्वत:च्या शक्तीने कायम राहणारा
६५. अल्-वाजिदु : अस्तित्व देणारा
६६. अल्-माजिदु : श्रेष्ठ, उत्तम, महान
६७. अल्-वाहिदु : एकमेव, अद्वितीय
६८. अल्-समदु : निरपेक्ष
६९. अल्-क़ादिरु : पूर्ण सामर्थ्यवान
७०. अल्-मुक्तदिरु : ईश्वरी शक्तीचा
७१. अल्-मुकद्दिमु : पूर्वीच सचेत करणारा
७२. अल्-मुआख्खिरु : वेळ देणारा
७३. अल्-अव्वलु : सगळ्यांत प्रथम
७४. अल्-आख़िरु : सगळ्यांत शेवटचा

## १) अल्लाहु - अल-इलाह

अरब लोकांसाठी 'अल्लाह' हा शब्द सूपरिचित होता. ३६० मूर्तींची पूजा करीत असतानाही त्यांना अल्लाह म्हणून संबोधित करीत नसत. काबा या इमारतीला ते बैतुल्लाह म्हणत असत. अल्लाहने स्वःची ओळख खालीलप्रमाणे करुन दिली.

"सांगा, तो अल्लाह आहे एकमेव. अल्लाह सर्वांपासून निरपेक्ष आहे आणि सर्व त्याचे गरजवंत आहेत. न त्याची कुणीही संतती आहे आणि न तो कोणाची संतती. आणि कुणी त्याच्या समान नाही."

*(दिव्य कुरआन, ११२: १-४)*

**अल इलाह :** तोच अल्लाह आहे, त्याच्याशिवाय कोणीही उपासनेस योग्य नाही. म्हणून त्याला वगळून किंवा त्याच्या बरोबर जमिनीवर व आकाशांत कोठेही लोक इलाह बनवून पूजा-अर्चना करतात, ते सर्व खोटारडे आहेत व सत्याविरुद्ध त्यांनी युद्ध पुकारले आहे. सारे अधिकार एकट्या अल्लाहकडे आहेत, दूसरा कोणी ते घेऊ शकत नाही. सर्व विश्वाचा स्वामी तो एकटा आहे.

## २, ३) अर्रहमान -अर्रहीम

मोठा मेहेरबान व अतिशय दया करणारा.

माणसाच्या नजरेत एवाद्या गोष्टीबद्दल अतिशयोक्ती करावयाची असल्यास एका शब्दाने न थांबता त्याच अर्थाचा दुसरा शब्द त्याला जोडतात. तसेच अरबी भाषेत 'रहमान' शब्द उच्चारल्यानंतर 'रहीम' शब्दाचा प्रयोग केला आहे. म्हणजेच मोठा मेहेरबान व अतिशय दया करणारा अल्लाह आहे.

अल्लाहने माता-पित्याच्या ह्दयात प्रेम निर्माण केले. दया निर्माण केली व अल्लाह आपल्या पाल्यांवर सत्तर मातेपेक्षा जास्त दयावान आहे. त्याची अवज्ञा करणाऱ्यांना कित्येक काळ सुधारण्याची संधी देतो व त्याने पश्चात्ताप व तौबा केल्यास माफ करतो.

ही अल्लाहची सहिष्णुता व उपेक्षा आहे की तुम्ही वर्षानुवर्षे अधर्म, नास्तिकता, पथभ्रष्टता व अन्यायकारी जीवन जगत असताना तुमचे पालनपोषण बिनदिक्कत करीत आहे. त्याची मेहेरबानी म्हणून तुम्ही जे श्रम करतात, त्यानंतर तुम्हाला झोपेद्वारे आराम पोहचवतो झोपेशिवाय माणसाला गत्यंतर नाही.

## ४) अल मालिकु -सम्राट, बादशाह

या शब्दाचा अर्थ निघतो की, खास क्षेत्रासाठी अथवा देशासाठी नसून सर्व जगाचा बादशाह असून संपूर्ण विश्व व ब्रह्मांडावर त्याचे स्वामित्व आहे. प्रत्येक वस्तुचा तो मालक आहे. सर्वकाही त्याच्या वशमध्ये आहे, अधिपत्याखाली आहे व राजसत्ताधिकारीला कोणीही रोखू शकत नाही.

कुरआन सूरह अर्रुम, आयत २६: आकाशांमध्ये व धरतीवर जो कोणी आहे, सर्वच्या सर्व त्याच्याच हुकुमामे नियम बंधनात जखडलेले आहेत.

"आकाशांची व धरतीची राजसत्ता केवळ त्याच एकट्याची आहे."
*(दिव्य कुरआन, ४२:४९)*

माणसाला धोक्यात घालणाऱ्या साऱ्या सत्ताधारींचा भ्रमनिराश होईल की ज्या दिवशी महाप्रलय अस्तित्वात येईल. पैगंबर (स.) यांनी फर्मावि‍ले की त्या दिवशी अल्लाहच्या एका हातात सर्व अंबर व दुसऱ्या हातात जमीन घेऊन घोषणा देईल, "मी बादशाह आहे, मी शासक आहे कोठे आहेत जमिनीचे बादशाह? कोठे आहेत महाशक्तिवान व महान अत्याचारी? व कोठे आहेत अभिमानी व अहंकारी लोक." (अल्लाहचे हात हे माणसांना समजण्यासाठी.)

## ५) अल-क़ुद्दुसु - महापवित्र

हा शब्द अतिशयोक्ती दर्शविणारा आहे. 'तमाम वाईट विशेषणांपासून अलिप्त व निर्दोष' चा अर्थ असा की, सर्वोत्तम अस्तित्व. ब्रह्मांत कोणतेही दोष नाहींत. कसलीही त्रुटी नाही व कोणत्याही प्रकारची वाईट कल्पना करता येत नाही. राज्यसत्ता व शासनाकरिता महापवित्रता अनिवार्य आहे व याविरुद्ध माणसाची सद्‌विवेकबुद्धी याविरुद्ध विशेषणांची सत्ता कदापि मंजूर करणार नाही.

"अल्लाहचे पावित्र्य गान करीत आहे ती प्रत्येक वस्तू, जी आकाशांत आहे आणि ती प्रत्येक वस्तू जी जमिनीत आहे. बादशाह आहे अत्यंत पवित्र, जबरदस्त आणि बुद्धिमान." *(दिव्य कुरआन : ६२-१)*

## ६) अस्-सलामु - सर्वथा शांती, क्षेम

कोणाला संपूर्ण सुरक्षित (सालिम) अथवा शांतीप्रिय (सलीम)

अस्तित्वात आल्या. वेगवेगळया फळांची चव वेगळी, मात्र जमीन व पाणी तेच.

माणसाच्या निर्मितीचा नियम सरळ आहे. वीर्यापासून तयार होणाऱ्या माणसांतील विविधता सांगण्याची व समजविण्याची गरज नाही. प्रत्येक माणूस वेगळा, साम्य असूनही बोलण्याची ढब वेगळी, चालणे वेगळे, वागणे वेगळे प्रत्येक देशातील माणसे वेगळी, इतकी विविधता कोणत्याही वस्तुत सापडणार नाही. निर्मितीपासून तर आजतागायत सारखेपणा नसून नवीन नवीन सुधारित आवृत्ती पाहावयास मिळत आहे, म्हणजे अल्लाह अजूनही निर्मितीकडे लक्ष देत आहे.

माणसांच्या निर्मितीत पुरुष आणि स्त्रिया बनविल्या. दोघांची शरीररचना त्यांच्या कार्यासाठी वेगवेगळी बनविली. त्यांच्या जोडप्यापासून कधी मुली, कधी मुलगे, कधी दोन्ही तरी काही जोडप्यांना काही नाही. हजारो वर्षांपासून हे सर्व निर्विवाद चालत आहे. येणारी व्यक्ती अगदी वेगळी त्याच्या हाथावरचे ठसेसुद्धा वेगळे, त्याचे वागणे वेगळे. आजही या साध्या वाटणाऱ्या गोष्टींत किती महान कार्य दडलेले आहे हे मान्य करावेच लागेल.

## १३) अल्-बारीअु- योजनेची अंमलबजावणी करणारा

अल्लाहसाठी 'बारी' हे विशेषण यासाठी की तो योजना आखतो, त्यानुसार शून्यातुन त्याचा आराखडा तयार करतो आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी करतो. याचे उदाहरण म्हणजे अभियंता गरजेनुसार मनात योजना तयार करतो, त्यानुसार जमिनीवर मांडणी करुन पाया खोदून पायाभरणी करुन भिंती उभारतो व बांधकामाचे पुढील सोपस्कार पूर्ण करतो.

## १४) अल्-मुसव्विरो-
## योजनेनुसार चित्रकारी करणारा अल्लाह

अनुक्रमांक १२ व १३ नंबर तिसरी पायरी म्हणून प्रत्येक वस्तूला अंतिम चेहरा मोहरा देऊन चित्रकारी करुन अंतिम स्वरुप देतो. अल्लाहला एखादी योजना करताना नमुना लागत नाही. माणसाला एखादी गोष्ट बनवितांना नमुना लागतो व लागणारे सामान अल्लाह निर्मितीतुन घ्यावे लागते. अल्लाह निर्मिती शून्यातून करतो व मूळ पदार्थ ही अल्लाहचीच निर्मिती आहे. अल्लाहने हरप्रकारे व प्रत्येक इसमाची आकृती व सौंदर्य अपूर्व बनविले असून पुनरावृत्ती नाही.

## १५) अल्-ग़फ़्फारु,गाफ़िरिज जंबि - क्षमाशील, अपराध क्षमा करणारा

"जो पश्चात्ताप करील आणि श्रद्धा ठेवील व सत्कृत्ये करील, मग सरळ वाट चालत राहील त्याच्यासाठी मी फार क्षमा करणारा आहे."

*(दिव्य कुरआन , २०:८२)*

शक्तिशाली असा की तो दंड देणे उचित ठरवेल तर कोणी प्रतिरोध करु शकणार नाही, परंतु तुम्ही दुस्साहस जरी करीत असाल तरी तो तुम्हाला तत्काळ पकडत नाही व सूट वर सूट देत आहे व त्वरित दंड देत नाही. याचाच अर्थ असा की सूट देणे म्हणजे माफ करण्यासारखेच आहे.

माफीसाठी चार अटी आहेत. १. पश्चात्ताप म्हणजे अवज्ञा, अनेकेश्वरत्व व नास्तिकतेपासून अलिप्त होणे. २. ईमान व श्रद्धा म्हणजे अल्लाह, पैगंबर, कुरआन परलोकाला मनापासून मान्य करणे ३. सत्कर्म करणे. अल्लाह व पैगंबरांच्या आदेशानुसार सत्कर्म करणे. ४. सरळ मार्गावर अटळ राहणे व पथभ्रष्ट न होणे.

## १६) अल्-कहहारु-अल-क़ाहिरु- सर्वांवर प्रभुत्वशाली पूर्ण स्वामीत्व, प्रभुता राखणारा अल्लाह

"तुम्ही स्वत:च विचार करा की पुष्कळसे विभिन्न पालनकर्ते उत्तम आहेत अथवा तो एक अल्लाह जो सर्वांवर प्रभावी आहे?"

*(दिव्य कुरआन , १२:३९)*

अल्लाह आपल्या प्रभुत्वशाली ताकदीने सर्वांवर अधिकार चालवतो व सगळयांना काबुत ठेवतो, कारण त्यानेच सगळयांना निर्माण केले आहे. म्हणून तोच उपास्य आहे. त्याने निर्माण केलेल्या वस्तुंना तुम्ही कसे काय उपास्य समजता? खर तर अल्लाह हाच एकमेव उपास्य आहे, ज्याच्या हातात सर्व सत्ता आहे. तुमच्या भल्या-बुऱ्यासाठी, तुमच्या भविष्याची दोरी त्याच्या हातात आहे. संकटसमयी तुम्ही त्याचीच आराधना करण्यास हतबल होता.

## १७) अल्-वहाबु - महादाता, खरा दानशूर

"हे पालनकर्त्या! जेव्हा तू आम्हास सरळ मार्गावर आणले आहेस तर आमची मने वक्रतेत गुंतवू नकोस. आम्हाला तुझ्या औदार्याच्या भांडारातून कृपा प्रदान कर, कारण तचू खऱ्या अर्थाने उदार आहेस."

*(दिव्य कुरआन, ३:८)*

अल्लाहला भक्ताची अकड नापसंद आहे व त्याची नम्रता पसंद आहे, आवडती आहे. भक्ताची नम्रता अल्लाह कृपेला पात्र आहे. कितीही संकट आले तरी अल्लाहपाशी तक्रार ना करता विनंतीपुर्वक प्रार्थना केल्यानेच संकटावर विजय मिळतो. तो महादाता प्रसन्न होतो.

## १८) अल्-रज्जाकु, अल-राज़िकु - सगळ्यांची उपजीविका देणारा, चांगला अन्नदाता

"अल्लाह तर स्वतःच उपजीविका देणारा आहे, मोठा शक्तिमान आणि जबरदस्त." *(दिव्य कुरआन, ५१:५८)*

या जगात कल्पित आजीविका देणारे साधन म्हणजे पगार, रोजंदारी, जेवण दिसून येते. काही व्यक्ती कारागिरी करुन औद्योगिक कारखाने चालवतात, परंतु या सर्वांपेक्षा अल्लाह उत्कृट उपजीविका देणारा आहे. जगातील सर्व निर्मितीचे मूळ अल्लाहची कृती आहे. सर्व खाद्यपदार्थांची निर्मिती निसर्गातून झाली आहे. बेसुमार अगणित पक्षी, जनावरे, समुद्रातील जीव-जंतु आपापले अन्न घेऊन फिरत नाही. जिथे जातात तिथेच त्यांच्या अन्नाची व्यवस्था होते. अल्लाहची कृपादया आहे म्हणून सर्व जगत आहेत. माणसासाठी योग्य असे धान्य, भाजीपाला, फळे, दूध, मध, मांस, मीठ, मिरची, गरम मसाले व इतर वस्तु भांडाराच्या स्वरुपात उपलब्ध करुन देऊन अल्लाहने कृपाच केलेली आहे.

## १९) अल्-फत्ताहु- अल-फ़ातिहु - शक्तिशाली अधिकारी, निश्चयात्मक निर्णय देणारा

"आमचा पालनकर्ता आम्हाला एकत्र करील, मग आमच्या दरम्यान यथायोग्य निर्णय लावील. तो असा जबरदस्त शासक आहे जो सर्वकाही जाणतो." *(दिव्य कुरआन , ३४:२६)*

वास्तविक आशय असा की, तुम्हाला व आम्हाला दोघांना आपल्या रबसमोर हजर व्हावे लागेल. रब असा की दोन्ही वर्गांना पूर्णपणे ओळखतो त्याला इंथभूत माहिती आहे की आमच्यापैकी कोण सत्यावर चालणारा आहे आणि कोण असत्याचा वाली आहे. मग याचा फैसला होणार की सत्यासाठी कोणी काय केले व कोणी कोणी सत्याचा विरोध केला.

## २०) अल्-अ़लीमु- अल अ़ल्लामु- सर्वकाही जाणणारा

आलिमुल-गैबि वश-शहादति : प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वस्तुंचा जाणकार अल्लाह.

माणसाच्या अखत्यारीत हे शक्य नाही की सर्व गोष्टींचे ज्ञान त्याला असेल. हे ज्ञान फक्त अल्लाहपाशीच आहे. तोच महाश्रोता व ज्ञानी आहे व तोच सांगू शकतो की माणसाच्या भल्यासाठी कोणता मार्ग व पथप्रदर्शन योग्य आहे व दुष्टता काय व कशात आहे.

माणसाच्या समृद्धीची भिस्त पावसावर अवलंबुन आहे. पावसाचा सर्व हिशेब अल्लाह ठरवितो. कोठे पाऊस पडेल, पडणार नाही, किती पडेल, कोणत्या जमिनीवर त्या पावसाचा फायदा होईल, किती भागांत अतिवृष्टीने नुकसान होईल? तुमच्या अर्धांगिणीचा उदगंत तुमची संतान आहे पण तुम्हाला माहीत नाही की कोणत्या स्वरुपात आहे व बाहेर आल्यानंतर काय घडते? त्याच्या अथवा तिच्या नशिबी काय आहे? ही सर्व माहिती अल्लाहकडेच आहे व तुम्हाला ज्ञात नाही. सर्व नियोजन अल्लाहजवळ आहे.

जमिनीवर एक-एक बीज पडते. त्यातून कोंब फुटून बाहेर पडते हे सर्व अल्लाहच्या नजरेत आहे. एक-एक पान जे वाऱ्याने डोलते, अथवा सुकून खाली पडते ते सर्व अल्लाहला ठाऊक असते.

याच प्रकारे कोण श्रद्धावान आहे व कोणत्या पातळीवर त्याची श्रद्धा आहे व तो काय करतो व तसेच त्याच्या परिक्षेसाठी जगात काय-काय अडथळे निर्माण केलेले आहेत व त्यात मनुष्य काय प्रयत्न करुन चांगल्या मार्गाने चांगले कार्य करीत आहे, हे अल्लाह जाणतो व तो विनाकारण काहीही त्रासदायक गोष्टी करीत नाही.

''नि:संशय अल्लाह आकाश आणि पृथ्वीतील प्रत्येक अदृष्य

वस्तूपासून परिचित आहे. तो तर अंत:करणातील गुप्त रहस्यदेखील जाणतो.''
*(दिव्य कुरआन, ३५:३८)*

कयामत केव्हा होईल, पाऊस केव्हा व कोठे पडेल, केव्हा, कोठे व कसा मृत्यु येईल याबाबत अल्लाह जाणतो. इतरांना याची कसली खबर-बात माहीत नाही. अल्लाह आपल्या आवडत्या व्यक्तींना माहितीचा थोडा बहुत भाग आपल्या मर्जीने प्रदान करतो परंतु गोपनियतेच्या सर्व चाव्या त्याच्या ताब्यातच असतात. स्वत: पैगंबर मुहम्मद (स.) यांना सुद्धा मोजकेच व पैगंबरीकार्यात लागणारेच ज्ञान प्रदान करण्यात आले होते.

## २१) अल्-क़ाबिज़ु- घटविणारा व काबिज करणारा

''सांगा, असा कोण आहे की जो अल्लाहला चांगले कर्ज देईल की अल्लाह त्याला कित्येक पटीने वाढवून परत करील? घट करणेसुद्धा अल्लाहच्या अखत्यारीत आहे आणि वाढविणे देखील, आणि त्याच्याकडेच तुम्हाला परत जावयाचे आहे. *(दिव्य कुरआन, २:२४५)*

पवित्र कुरआनमध्ये पूर्ण अधिकाराचे चित्र उभारताना अल्लाह फर्मावितो की ''पृथ्वी मुठीत व सर्व आकाश हातावर गुंडाळलेले असतील. लोकांनी या जगात महान अल्लाहचा यथायोग्य मान व आदर ठेवला नाही'' असे पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले व असे प्रवचन देताना त्यांना कापरे भरले होते.

## २२) अल्-बासितु - विस्तृत करणारा

''अल्लाह ज्याला इच्छितो विपुल उपजीविका प्रदान करतो आणि ज्याला इच्छितो त्याला मोजकी उपजीविका देतो. हे लोक ऐहिक जीवनात मग्न आहेत. खरे पाहता ऐहिक जीवन परलोकाच्या तुलनेत एका अल्पशा सामुग्री व्यतिरिक्त काहीच नाही.'' *(दिव्य कुरआन, १३:२६)*

उपजीविका कमी-जास्त होणे ही अल्लाहच्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे. चांगल्या व वाईट प्रवत्तीच्या माणसांनासुद्धा अन्न मिळत आहे. अल्लाहवर श्रद्धा ठेवणाऱ्यांना व नास्तिकांना सुद्धा अन्न मिळत आहे. साधनसंपत्ती अधिक प्रमाणात असणे म्हणजे तो अल्लाहचा लाडका आहे व गोर-गरीब असणे म्हणजे दुर्लक्षित आहे, असा होत नाही. अल्लाहच्या इच्छेनुसार अत्याचारी, नास्तिक या जगात धनसंपन्न होतो, जरी अत्याचार व नास्तिकता अल्लाहला पसंद नाही.

अशा माणसाने परलोकात यातनेसाठी तयार असावे.

## २३) अल्-ख़ाफिजु- पाडणारा

## २४) अर्-राफिअु- उंच करणारा उचलणारा

ही दोन्ही नावे कुरआनमध्ये अस्माऊल हुसनामध्ये आली नाहीत.

"तुम्हापैकी जे लोक श्रद्धावंत आहेत आणि ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले आहे, अल्लाह त्यांना उच्च दर्जे प्रदान करील आणि जे काही तुम्ही करता अल्लाहला त्याची खबर आहे." *(दिव्य कुरआन, ५८:११)*

ज्ञानी लोकांचे दर्जे उंचावताना त्याचे खरेपण, सत्यता, पवित्रता पाहिली जाते. सदाचारी जे खऱ्या भावनेने अल्लाहची आराधना करतात व श्रद्धेने सदाचारी असतात त्यांचे दर्जे उंचावले जातात.

अल्लाहने पैगंबरांचे दर्जे उंचावले आहेत. कुणाशी अल्लाहने परस्पर वार्तालाप केले आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांना आकाशातील उच्चतम स्थानी बोलावून दर्शन मेअराजच्या रात्री घडविले. आम्ही त्यांना एकमेकांवर मोठेपणा प्रदान केला. त्यांच्यामध्ये कोणी असेही आहेत की अल्लाहने त्यांच्याशी बातचीत केली आणि काहीच्या दर्जामध्ये उच्चता प्रदान केली आणि मरियमचे पुत्र ईसा यांना स्पष्ट निशाण्या प्रदान केल्या आणि त्यांना 'रुहुल कुदूस' (पवित्र आत्मा) द्वारे मदत पोहचविली.

"आकाशाला पहात नाहीत की कसे उभारले गेले? पर्वतांना पहात नाहीत की कसे दृढकेले गेलेत? आणि पृथ्वीला पहात नाहीत की कशी अंथरली गेली" *(दिव्य कुरआन, ८८:१८-२०)*

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा दर्जा उंचावलेला आज आपण अनुभव करतो. आज जगात त्यांचेवर दरुद पाठविले जाते. दिवसातून पाच वेळा अजानद्वारे पैगंबर मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर असल्याची ग्वाही दिली जाते. दिवसाच्या प्रत्येक घडीत संपूर्ण पृथ्वीवर कोठे न कोठे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे गुणगान व नाव घेतले जाते.

## ३०) अल्-अदलु - न्याय करणारा

आपल्या निर्मित सर्व जीवांवर न्याय करणारा अल्लाह सगळयांसाठी मग तो लहान असो वा मोठा, श्रीमंत असो वा गरीब, सज्जन असो वा दुर्जन समान 'न्याय' करतो. न्याय चा अर्थ समानता असा समज करु नये. समाजात आई-वडील व मुलांमध्ये हक्काची समानता कशी असेल? ज्याचे त्याचे कर्तव्य व हक्क समान असूच शकत नाहीत. नातलगांच्या संबधावर कर्तव्य व हक्कांचे नियंत्रण ठेवणे म्हणजे न्याय करणे होय. असंतुलन दूर करणे अन्यायाला न्याय मिळवून देणे म्हणजे अदल होय.

विश्वाचा कारोबार नेमलेल्या नियमांप्रमाणे सुरु आहे. अगणित ग्रह, तारे, अंतरिक्षात भ्रमण करीत आहेत. त्यांच्या दरम्यान योग्य अंतर, गुरुत्वाकर्षण, भ्रमण सर्व काही ठरविलेले असून त्यांचे नियंत्रण अल्लाह करीत असतो. अंतरिक्षाचे सोडा या जमिनीवर निसर्गाचे संतुलन कोट्यावधी वर्षापासून कायम आहे. सर्व जिवांचे संरक्षण कायम आहे, सृष्टी अजून कायम आहे.

## ३१) अल्-लतीफु - आपले मनसुबे बेमालूमपणे पूर्ण करणारा, गुप्त सत्य जाणणारा

अल्लाह आपल्या भक्तांवर, सेवकांवर वात्सल्य व प्रेम करतो व बारीक-सारीक गोष्टींवर लक्ष ठेऊन त्यांच्या गरजा पूर्ण करतो. लक्षावधी मुले जन्माला येतात. त्यांत इब्राहीम (अ.) तीन चतुर्थांश जगाचे आध्यात्मिक गुरु होतील. कोणी चंगेजखान असेल जो आशिया व युरोप खंडात हाहाकार माजवेल व लाखो जिवांची कत्तल करेल. कोणी कल्पना केली होती की अणुबॉम्ब व हायड्रोजन बॉम्ब निर्मिती केली जाईल! कोलंबस प्रवासाला निघाला तेव्हा कोणी कल्पना केली होती की तो अमेरिकेचा शोध लावेल? अल्लाहचे नियोजन असे की कोणाचीही दूरदृष्टी तिथपर्यंत पोहचत नाही.

"माझा पालनकर्ता नकळत उपाययोजनेद्वारे आपले मनोरथ साकार करतो, नि:संशय तो सर्वज्ञ व बुद्धिमान आहे."

*(दिव्य कुरआन, १२:१००)*

"अल्लाह आपल्या दासांवर फार मेहरबान आहे. ज्याला जे काही इच्छितो देतो, आणि तो मोठा शक्तिशाली आणि जबरदस्त आहे."

*(दिव्य कुरआन, ४२:१९)*

## ३२) अल्-ख़बीरु - अत्यंत सचेत अल्लाह

अल्लाह आपल्या विश्वाबाबत सचेत असून उद्देश व गरज जाणून आहे व आपली कामे कशी करावीत हे अत्यंत चांगल्या प्रकारे त्याला माहीत आहे. अल्लाहला आपल्या प्रत्येक निर्मितीबाबत पूर्ण ज्ञान आहे की कोण कोठे आहे, कोणत्या परिस्थितीत आहे. त्याच्या गरजा काय आहेत? त्याने आतापर्यंत काय केले आहे व पुढे काय करणार आहे!

अल्लाह आंधळा नाही, बहिरा नाही. तो पूर्ण सामर्थ्याने विश्वावर शासन करीत आहे. या बाबतीत कुरआनच्या अनेक सूरहमधुन काही आयती देण्यात येत आहे.

(सूरह बकर: आयत २३४ व २७१), (सूरह आले इमरान आयत १५३), (सूरह अल-माएदा आयत ८), (सूरह अल-अनआम आयत १८,७३,१०३), (सूरह तौबा आयत १६), (सूरह हुद आयत १, १११), (सूरह हज आयत ६३), (सूरह नूर आयत ३०, ५३), (सूरह नम्ल आयत ८८), (सूरह लुकमान आयत १६, २९, ३४.)

## ३३) अल्-हलीमु - महा सहनशील, उदार अल्लाह

'हलीम'चा अर्थ स्वत:च्या स्वभावावर नियंत्रण ठेवणारा. रागाच्या भरात शत्रुत्वात नियंत्रणाबाहेर न जाणारा व प्रेमात, मैत्रींत व जवळच्या सबंधितांसाठीसुद्धा मनाचा समतोल बिघडू न देणारा असा होय.

लोकांच्या लहान-लहान चुकांकडे दुर्लक्ष करुन त्यांनी केलेल्या चांगल्या कृत्यांकडे पाहून माफी देतो. त्यांचे मन व अंत:करण सीमित नाही. विशाल ह्रदयाचा अल्लाह छोट्या-छोट्या गोष्टींसाठी पकड करीत नाही. तुमचे अन्न-पाणी थांबवीत नाही. अल्लाह ज्याचे तुम्ही दास आहात, तुम्हीपण हा गुण आत्मसात केला पाहिजे.

"अल्लाह तुम्हाला तुमच्या निरर्थक शपथांबद्दल पकडणार नाही परंतु ज्या शपथा तुम्ही प्रामाणिकपणे घेता त्याविषयी तुम्हाला अवश्य विचारले जाईल. अल्लाह अत्यंत क्षमावंत आणि सहनशील आहे."

*(दिव्य कुरआन, २:२२५)*

(सूरह अहजाब, आयत : ५१, सूरह फातिर, आयत : ४१, सूरह आले इमरान, बयत : १५५)

## ३४) अल्-अजीमु - महान व्यक्तित्व असणारा अल्लाह

"त्याचे राज्य आकाश आणि पृथ्वीवर पसरले आहे, आणि त्यांचे संरक्षण काही त्याला थकवून सोडणारे काम नव्हे. फक्त तोच एकटा महान व श्रेष्ठ आहे." *(दिव्य कुरआन, २:२५५)*

"आकाशात आणि पृथ्वीत जे जे काही आहे त्याचेच आहे, तो उच्चतर व महान आहे." *(दिव्य कुरआन, ४२:४)*

अल्लाह इतका महान आहे कि त्याच्यापेक्षा कोणी महान असूच शकत नाही म्हणून पैगंबर (स.) यांना अल्लाहने सांगितले की,

"आपल्या महान पालनकर्त्याच्या नावाचे पावित्र्यगान करा." *(दिव्य कुरआन, ६९:५२)*

## ३५) अल्-गफूरु - क्षमावान-शमाशील

तो अत्यंत महान व अधिकार प्राप्त असूनही आपल्या सृष्टीतल्या जीवावर कृपा दया करतो. अत्याचारी नाही, कठोर नाही. कुकर्म करणाऱ्यांना त्याला पूर्ण अधिकार असूनसुद्धा तो तत्काळ शिक्षा न देता क्षमायाचना करणेसाठी पुरासा वेळ देतो आणि माफी मागणाऱ्यांना माफ करुन स्वत: आनंदी होतो की त्याला क्षमावान समजण्याात आले आहे. माफीसाठी अल्लाहचे दरवाजे सदैव उघडे असते.

**कुरआन संदर्भातील काही आयती :**

सूरह तौबा : आयत- २७, ९१, ९९, १०२, सूरह युनूस : आयत- १०७, सूरह हुद : आयत- ४१, सूरह युसूफ : आयत- ५३, ९८, सूरह इब्राहीम : आयत- ३६, सूरह हिज्र : आयत- ४९, सूरह नमल : आयत- १८, ११०, ११५, ११९, सूरह कहफ : आयत- ५८, सूरह हज : आयत- ६०, सूरह नूर : आयत- ५, २२, ३३, ६२ इत्यादी.

## ३६) अश्‌-शकूरु, अश्‌-शाकिरु - कद्रदान गुणज्ञाता अल्लाह

मनापासून श्रद्धाळू लोकांबरोबर अल्लाह लहान लहान गोष्टीवर पकड करीत नाही. तो दयाळू प्रभु आपल्या भक्तांवर मेहेरबान असून जी काही सेवा अल्लाहची त्यांनी केली आहे त्याची कदर करतो.

'शुक्र'चा अर्थ कृपेची स्वीकृती होय. मनुष्याने मनापासून कृपेचा स्वीकार करावा व तोंडी त्याचा उच्चार करावा व आपल्या कृतीतून ते प्रमाणित करावे. या तिन्ही गोष्टी 'शुक्र' केले असे समजले जाईल. ही सर्व प्रक्रिया अल्लाहच्या आशीर्वादानेच झाली आहे, असे समजावे.

"धन्यवाद त्या अल्लाहला ज्याने आम्हापासून दु:ख दूर केले, नि:संशय आमचा पालनकर्ता क्षमाशील व कदर करणारा आहे." *(दिव्य कुरआन ३५:३४)*

"जेणेकरून अल्लाहने त्याचा मोबदला पुरेपूर त्यांना द्यावा. आणि आपल्या कृपेने त्यांना अधिक प्रदान करावे. नि:संशय अल्लाह क्षमाशील व गुणग्राहक आहे." *(दिव्य कुरआन ३५:३०)*

## ३७) अल्‌-अलिय्यु, अल अअला - उच्चतर अधिकारी, प्रभुत्वशाली सर्वात महान

तो अल्लाह उच्चतर व महान आहे. त्याच्यासारखा दूसरा कोणीही नाही. कोणीही त्याच्या सत्तेत, गुणविशेषणांत व अधिकारांत भागीदार नाही. तो सर्वस्व स्वामी असून त्याच्या निर्मितीतील कोणीही त्याची बरोबरी करु शकत नाही कोणत्याही मानवाची ताकद व संधी नाही की तो अल्लाहशी बोलावे. अल्लाह फरिश्त्याला संदेशवाहक बनवून पैगंबराकडे अल्लाहचे आदेश पोहचवून देतो.

"आकाशात आणि पृथ्वीत जे जे काही आहे त्याचेच आहे, तो उच्चतर व महान आहे." *(दिव्य कुरआन, ४२:४)*

सूरह हज : आयत- ६२, सूरह लुकमान : आयत- ३०, सूरह सबा : आयत- २३, सूरह ग़ाफ़िर : आयत- १२, सूरह शूरा : आयत- ५१, सूरह निसा : आयत- ३४, सूरह मरयम : आयत- ५०, ७५ इत्यादी.

## ३८) अल्-कबीरु - ज्येष्ठ

प्रलय दिनी अल्लाहच्या प्रतापी रुपाने सगळेच भयभीत असतील. अशा वेळी शिफारस करण्यासाठी कोणीही हिंमत करणार नाही. क्षमायाचनेसाठी शिफारस करणारा व ज्यांच्यासाठी शिफारस करावयाावी आहे ते परवानगीसाठी आतुरतेने वाट पाहत असतील. काही काळानंतर शिफारस करण्याची परवानगी अल्लाहकडुन प्राप्त होईल. शिफारस करणारा म्हणेल की मोठ्या दरबाराची शान अशीच आहे की जोर-जबरदस्तीने शिफारस स्वीकारली जाणार नाही. मर्जी व मोठेपण अल्लाहसाठी आहे.

"आणि अल्लाहच्या हुजुरात एखादी शिफारसदेखील कुणाला लाभदायक ठरू शकणार नाही केवळ त्या व्यक्तीखेरीज ज्यासाठी अल्लाहने शिफारसीची परवानगी दिलेली असेल." *(दिव्य कुरआन, ३४:२३)*

"ही स्थिती ज्यामध्ये तुम्ही गुरफटलेले आहात, अशा कारणाने आहे की जेव्हा एकट्या अल्लाहकडे बोलाविले जात होते तेव्हा तुम्ही मानण्यास नकार देत होता, आणि जेव्हा त्याच्याबरोबर दुसऱ्यांना बोलाविले जात असे तेव्हा तुम्ही मान्य करीत होता, आता निर्णय श्रेष्ठ व उच्चतर अल्लाहच्या हाती आहे."

*(दिव्य कुरआन, ४०:१२)*

## ३९) अल्-हफीजु, अल्-हाफिजु - प्रत्येक गोष्टीची देखरेख करणारा व रक्षक अल्लाह.

"तुझा पालनकर्ता प्रत्येक गोष्टीची देखरेख करणारा आहे."

*(दिव्य कुरआन, ३४:२१)*

"ज्या लोकांनी त्याला सोडून काही अन्य आपले वाली बनविले आहेत, अल्लाहच त्यांच्यावर निरीक्षक आहे, तुम्ही त्यांचे हवालदार नाही."

*(दिव्य कुरआन, ४२:६)*

पैगंबर मुहम्मद (स.) यांना उद्देशून अल्लाह म्हणतो, "तो नास्तिकांचे कार्य पाहत आहे त्यांची कर्म-नोंद तयार करीत आहे. त्यांचा हिशेब व पकड तो करणार आहे. तुम्ही त्यासाठी त्रास घेऊ नका, तुम्ही जबाबदार नाही. त्यांचे भविष्य तुमच्या हाती नाही, त्यांना शिक्षा करावी अथवा ना करावी हे अल्लाहचे काम आहे."

या पृथ्वीवरचे जीवन व सलामती अल्लाहच्या कृपेवर अवलंबून आहे. तुमच्या जीवनाचे क्षण आणि क्षणाची देखरेख व रक्षण अल्लाहची जबाबदारी आहे. याद राखा! एक हलक्या इशाऱ्याने असे धरणीकंप होऊ शकतो की, तुमच्या जमिनीतच तुम्ही गाडले जाल किंवा एक जोरदार वादळ येईल, ज्यामुळे तुमच्या वसाहती नेस्तनाबुद होतील.

पवित्र कुरआनबाबतही अल्लाहने कुरआनमध्ये म्हटले आहे;

''अलिफ, लाऽऽम, रा ही वचने आहेत ईश्वरी ग्रंथाची व स्पष्ट कुरआनची.'' *(दिव्य कुरआन, १५:१)*

## ४०) अल्-मुकीतु - ईशशक्ती, नजर ठेवणारा, रोजी देणारा, साक्षी अल्लाह

''अल्लाह सर्व गोष्टींवर नजर ठेवणारा आहे.''

*(दिव्य कुरआन, ४:८५)*

अनादीकाळापासून ते प्रलयापर्यंत ज्या ज्या प्रकारचे प्राणी निर्मित होणार होते, सगळ्यांचा हिशेब करुन जमिनींत त्या त्या खाद्य-पदार्थाची सोय करण्यांत आली. प्रत्येक जिवाची गरज वेगवेगळी आहे. जमिनीवर पाण्यांत व हवेत उडणाऱ्या जिवांची खाद्य पदार्थांची सोय करण्यात आली. माणसाला वेगवेगळे प्रकारचे अन्न सामुग्री सकट विशेष आवडीनिवडीचे पदार्थ ठेवण्यात आले. कोणकोणते प्राणी कोणकोणत्या भागांत अस्तित्वात येतील व त्यांना पोषणासाठी काय काय लागेल, सर्व नियोजनबद्ध पद्धतीने सगळया गोष्टी होत आहेत. निसर्गांतील तमाम घडामोडीवर अल्लाहची नजर आहे व ईशशक्तीचा नमुना आमच्या समोर आहे.

## ४१) अल्-हसीबु- हिशेबनीस, हिशेब घेणारा

''आणि जेव्हा एखादा अदबीने तुम्हाला सलाम करील तर त्याला त्यापेक्षाही अधिक चांगल्या प्रकारे उत्तर द्या किंवा कमीतकमी त्याचप्रमाणे, अल्लाह प्रत्येक गोष्टीचा हिशेब घेणारा आहे'' *(दिव्य कुरआन, ४:८६)*

प्रत्येक मनुष्य अल्लाहच्यासमोर उत्तरदाई आहे. त्या अल्लाहसमोर जो जमिनीचा व आकाशाचा मालक आहे. तो लपलेल्या व उघड्या गोष्टींचा जाणकार

आहे व तो मनांतल्या गुप्त गोष्टींनासुद्धा जाणतो, अशा अल्लाहपासून काहीही लपलेले नाही.

प्रलयदिनी ज्यांचे कर्म-पत्र उजव्या हातात दिले जातील त्याचा हिशेब सोपा असेल. त्याच्या कामाबाबत फार खोल चौकशी केली जाणार नाही कारण पुण्याईचे वजन पापाच्या वजनापेक्षा भारी असेल. अल्लाह त्याला माफ करेल. पैगंबर मुहम्मद (स.) नमाज अदा करताना प्रार्थना करीत असत ''हे अल्लाह! माझ्या हिशेबाला हलका (सोपा) कर.''

## ४२) अल-जलीलु - महान, मोठा, बुजुर्ग

स्पष्टीकरणासाठी पान ५१ पहावे.

अनुक्रमांक ८५ पाहावे ''जुल-जलालि वल इक्राम''.

## ४३) अल-करीमु, अल् अक्रमु - दया कृपा करणारा, उत्तम व उत्कृष्ट महान कृपाळू

हे माणसा, तुला कुणी या जगात आणले? तू स्वत: काही तयार झाला नाही. तुझ्या आईवडिलांनी तुला घडवले नाही. आपोआप तुझे अस्तित्व तयार झाले नाही. ही सारी कृपा अल्लाहची आहे, तरी त्याची कृपा व आभार मानून न राहता अवज्ञा करीत असतो.

''हे मानवा, कोणत्या गोष्टीने तुला आपल्या उदार पालनकर्त्याच्या बाबतीत संभ्रमात टाकले ज्याने तुला निर्माण केले, तुला नखशिखांत व्यवस्थित केले, तुला प्रमाणबद्ध बनविले.'' *(दिव्य कुरआन, ८२: ६-७)*

''पढत राहा आणि तुमचा आज्ञा पालनकर्ताच सर्वात जास्त कृपाशील आहे.'' *(दिव्य कुरआन, ९६:३)*

अल्लाहने माणसाला ज्ञानी बनवले व शिकवले, ज्ञानानेच माणसाने प्रगती केली आहे.

## ४४) अर्-रकीबु - पाळत ठेवणारा

''दोन नोंदणारे त्याच्या उजव्या व डाव्या बाजूला बसून प्रत्येक गोष्टीची नोंद घेत आहेत. कोणताही शब्द त्याच्या तोंडातून असा निघत नाही ज्याला

सुरक्षित करण्यासाठी एक विद्यमान निरीक्षक हजर नाही.''

*(दिव्य कुरआन, ५०:१७-१८)*

एक तर अल्लाह सरळ-सरळ माणसांच्या हालचालीवर लक्ष ठेवून आहे. कृती तर सोडाच पण विचारांवरही देखरेख आहे. दुसरी गोष्ट, दोन दूत नेमलेले असून प्रत्येक गोष्टींची लेखी नोंद ठेवतात. याचाच अर्थ असा की अल्लाहपुढे न्यायासाठी उभे राहिल्यानंतर दोन साक्षीदारसुद्धा समोर असतील. अल्लाहला तर सर्व माहीत आहेतच. सर्व रेकार्ड पुन्हा माणसासमोर वाजविली जाईल व मग माणसाला गुन्हा कबूल करावाच लागेल. अल्लाहजवळ न्याय मिळेल खात्री बाळगा.

## ४५) अल्-मुजीबु : स्वीकारकर्ता, उत्तर देणारा अल्लाह

''आणि जेव्हा माझे भक्त तुम्हाला माझ्याबद्दल विचारतील तर (त्यांना सांगा की) मी तर सदैव निकट आहे. धांवा करणारा जेव्हा माझा धांवा करतो तेव्हा मी त्याच्या हाकेला प्रतिसाद देतो. तेव्हा त्याने माझ्या प्रतिसादाचा शोध घ्यावा माझ्यावर श्रद्धा ठेवावी जेणेकरून ते सन्मार्गावर येतील.''

*(दिव्य कुरआन, २: १८६)*

दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे अल्लाहजवळ आहे, त्यामुळे त्याला हळू पुकारले तरी तो ऐकतो. दुसरी गोष्ट म्हणजे 'मुजीब' आहे, म्हणजे तुमच्या पुकारावर उत्तर देणारा आहे. आपल्या सर्व मागण्या त्याचे पुढे मांडता येतील व सर्व गोष्टी गोपनीय राहतील. इतरांना त्या समजणार नाहीत. अल्लाहचा दरबार चोवीस तास चालू आहे, वर्षानुवर्षे सुरु आहे. मग त्याला सोडून इतर ठिकाणी कशाला जाता?

## ४६) अल्-वासिअ़ु - विशाल व व्यापक दृष्टी ठेवणारा

''पूर्व आणि पश्चिम अल्लाहच्याच आहेत. जिकडे तुम्ही तोंड कराल तिथे अल्लाहचे अस्तित्व आहे. कारण अल्लाह सर्वव्यापी आणि सर्वज्ञ आहे.''

*(दिव्य कुरआन, २: ११५)*

'वासिअु'चा एक अर्थ असा की तो तुमच्यासारखा संकीर्ण विचार व संकीर्ण दृष्टीचा नाही. संकीर्ण हृद्याचा नाही. कंजूष नाही व कोणत्याही प्रकारची सीमा नाही. अल्लाह अमर्याद व अति विशाल आहे.

## ४७) अल्-हकीमु - अतिज्ञानी, विद्वान, द्रष्टा व बुद्धीच्या मागणीप्रमाणे कार्य व निर्णय घेणारा

माणसांसाठी पथप्रदर्शनकरिता अल्लाहने जी काही योजना केली आहे. त्यात ईशदूतांद्वारे ईश संकेत पृथ्वीवर पाठविले. पैगंबरांना कुरआनसारखा महान ग्रंथ पाठविला. लोकांपर्यंत सरळ मार्ग कोणता हे कळावे म्हणून ईशदूतांना पाठविले. हे सर्व कार्य अत्यंत कुशलतेने पार करण्यात आले. तर आता माणसांनी पूर्ण सावधानी होऊन त्याचे आदेशाचे पालन करावे. परंतु काही माणसे अज्ञानी व मूर्ख असून सत्याकडे पाठ फिरवीत आहे.

अल्लाह जवळ असे लष्कर आहे की तो नास्तिकांना काही क्षणात नष्ट करु शकतो. परंतु त्याने ही जबाबदारी आस्तिकांवर सोपविली की त्यांनी नास्तिकांविरुद्ध लढा द्यावा प्रयास करावे आणि इस्लामची पताका उंचावी.

अल्लाहच्या निर्मितीकडे मनापासून पाहिले की निश्चितपणे जाणवते की केव्हाही प्रलय होऊ शकतो. काय एवढी मोठी निर्मिती करुन तो परत विचारपूस करणार नाही. जरुर लोकांकडुन हिशेब घेईल व त्यासाठी न्यायालय उभारले जाईल व न्याय निवाडा केला जाईल. पुरस्कार व दंड दिला जाईल.

जरा विचार करा, पाण्यासारखी वस्तूंत काय काय गुण लपलेले आहेत? समुद्राच्या पाण्यापासून वाफेच्या स्वरुपांत उचलले जाणे व जमिनीवर वेगवेगळ्या ठिकाणी पाऊस पाडणे, जमिनीवर ते स्थिरावणे, जिरणे व मातीत मिसळुन वेगवेगळ्या तापमानांत रोपे तयार होणे हे सर्व नियोजनबद्ध कामे कशाचे प्रतीक आहेत? अल्लाहची बुद्धी ज्याला लोक निसर्गाचे नियम म्हणतात, किती तंतोतंत नियोजन करते. हा प्रकार काही आजचा नाही, कोट्यवधी वर्षापासून या पद्धतीने कार्यक्रम सुरु आहे.

आकाशांत जमिनीबरोबर सूर्य आणि चंद्र कसे एकमेंकाच्या आकर्षणांच्या कक्षेत फिरत आहेत. कोट्यवधी फिरणारे ग्रह एकमेकांवर येऊन आदळत नाही. विश्वातील सर्व अधांतरी कोठेही टेकलेले नाही. पृथ्वीवर हवेचे आच्छादन असून ते उल्कापातपासून संरक्षण करते. सूर्यापासून खास अंतरावर ठेऊन जीवसृष्टी जीवंत ठेवली. रात्री प्रवास करणाऱ्यांसाठी आकाशांत ध्रुव तारा निर्माण केला, जो रात्रीतुन समुद्र प्रवासांत मार्गदर्शक ठरतो. दिवसा सूर्य मार्गदर्शक ठरतो. माणसाने डोळे उघडे ठेवून ही निर्मिती अवश्य पहावी.

## ४८) अल्-वदूदु - अतिप्रेमळ अल्लाह

"मी त्याच्यातर्फे तुम्हाला खबरदार करणारा देखील आहे व शुभवार्ता देणारादेखील. आणि तुम्ही आपल्या पालनकर्त्यापाशी क्षमायाचना करा आणि त्याच्याकडे परतून या तर तो तुम्हाला एका विशिष्ट मुदतीपर्यंत चांगली जीवनसामग्री देईल आणि प्रत्येक श्रेष्ठीला त्याचे श्रेष्ठत्व प्रदान करील."

*(दिव्य कुरआन, ११: २-३)*

"आणि तो क्षमा करणारा आहे. प्रेम करणारा आहे."

*(दिव्य कुरआन, ८५: १४)*

अल्लाह पाषाणहृदयी नाही, निर्दयी नाही. त्याला आपल्या प्राणीमात्राशी वैर नाही. त्याला आपल्या दासांना मारुन खूश व्हायचे नाही. तुम्ही कितीही अवज्ञा केली व परत त्याची माफी मागितली तर तो आनंदाने आपल्या कृपा-छायेत समावून घेईल, तो आपल्या दासांवर फार प्रेम करतो. सत्तर मातांपेक्षाही तो जास्त प्रेम राखतो.

## ४९) अल्-मजीदु - श्रेष्ठ, उत्तम, महान

"तुम्हावर तर अल्लाहची कृपा आणि त्याची समृद्धी आहे आणि निश्चितच अल्लाह अत्यंत प्रशंसेस पात्र व वैभवशाली आहे."

*(दिव्य कुरआन, ११: ७३)*

'मजीद' शब्दाचा अरबी भाषेत दोन प्रकारे वापर होतो. एक अतिउच्च कोटीचा महान प्रतिष्ठावान दूसरा याअर्थी की तो अधिक लाभदायक होय. अशा उच्च दर्जाच्या अल्लाहबाबत दु:साहस करणे माणसाला शोभत नाही.

## ५०) अल्-बाअिसु - पाठवणारा व (मेलेल्यांना जिवंत करुन) उठविणारा

"प्रारंभी लोकांचा एकच समूहसमाज होता. तेव्हा अल्लाहने पैगंबर पाठविले शुभवार्ता देणारे आणि सावधान करणारे आणि त्यांच्यासोबत ग्रंथ अवतरले."

*(दिव्य कुरआन, २:२१३)*

काही काळापर्यंत मानवाची ही टोळी एकत्र होती. काही काळानंतर

श्रद्धेत मतभेद पडायला सुरुवात झाली. जेव्हा जास्त बिघाड झाला तेव्हा आदमच्या या वंशातुनच अल्लाहने आपल्या कायद्यानुसार नबी व रसूल पाठवायला सुरुवात केली आणि त्यांचे सोबत ग्रंथ अवतरित केले. त्यांनी नवीन धर्म स्थापित केला नाही, परंतु त्यांच्या नावाने वेगवेगळे पंथ निर्माण झाले. शेवटचे पैगंबर मुहम्मद (स.) यांना अंतिम ग्रंथ अवतरित करुन कयामतीपर्यंत एकच उपदेश बोध आणि एकच अंतिम प्रेषित्व कायम केले.

लोकांची अशी समजुत आहे की पूर्वींच्या सर्व लोकांना पुन्हा जीवित करणे फार मोठे व कठीण काम आहे. अल्लाहच्या ईश शक्तीसाठी कोणत्या कामाला साधनसामुग्री आपोआप गोळा होऊन काम पूर्ण होते. आताची सृष्टिसुद्धा एक आदेशानेच अस्तित्वात आली आहे व दुसरी अवस्थाही अचानक एका आदेशानेच अस्तित्वांत येऊ शकते.

अल्लाह मेलेल्यांना जिवंत करेल हे तुम्हाला अद्‌भूत वाटते तर मग जरा भोवताली पाहा. कोरढ पडलेल्या जमिनीवर मृत वनस्पती बीजांवर पावसाच्या एक सरीने कसे हिरवेगार रोपे तयार होतात? आणि आपण प्रत्येक पावसाळ्यांत पाहतो, ज्या पदार्थापासून माणूस बनलेला आहे त्याच्यापासून जीवनात लाभ मिळतो व मेल्यानंतर ते सर्व पदार्थ पुन्हा एकत्र येऊन माणूस उभा केला जाईल. मनुष्याने मनुष्यनिर्मितीकडे जरा लक्ष द्यावे. पुरुषाच्या वीर्यापासून ते स्त्रियांच्या अंडकोषापर्यंत की ज्यांच्या मिलनाने जिवंत बालके अस्तित्वात येत आहेत.

"इन्कार करणाऱ्यांनी मोठ्या दाव्यानिशी म्हटले आहे की ते मृत्यूनंतर कदापि पुन्हा उठविले जाणार नाहीत, त्यांना सांगा, "नव्हे, माझ्या पालनकर्त्याची शपथ, तुम्ही अवश्य उठविले जाल, मग जरूर तुम्हाला दाखविले जाईल की तुम्ही (जगात) काय काय केले आहे, आणि असे करणे अल्लाहसाठी फार सोपे आहे." *(दिव्य कुरआन, ६४: ७)*

## ५१) अल्-शहीदु, अश-शहीदु : साक्षी

शहीद शब्दाचा अर्थ साक्षीचे आहे. अर्थात जो आपल्या श्रद्धेपाई आपल्या आयुष्यांत कार्यप्रणालीने साक्ष देईल तो शहीद. तसेच नास्तिकांविरुद्ध युद्ध करुन प्राण अर्पण करणाराही शहीद, कारण श्रद्धेपोटी, मनापासून प्राण त्यागले. तसेच सत्यनिष्ठ व सत्यवादी लोकांनाही शहीद म्हटले जाते कारण ते जे सांगतील ते खरे असेल.

"हे मुहम्मद (स.), आम्ही तुम्हाला लोकांसाठी पैगंबर बनवून पाठविले आहे आणि यासाठी अल्लाहची साक्ष पुरेशी आहे."

*(दिव्य कुरआन, ४:७९)*

अल्लाह पूर्ण विश्वाबाबत स्वत: जाणतो, त्याला प्रत्येक गोष्ट उघड उघड दिसते. जमिनीतील व आकाशांतील कुठली ही गोष्ट त्याच्यापासून लपलेली नाही. त्यामुळे अल्लाह पाहणारा व साक्षी आहे.

## ५२) अल्-हक्कु - सत्य, खरा, उचित

"तेव्हा हाच अल्लाह तुमचा खरा पालनकर्ता आहे. मग सत्यानंतर पथभ्रष्टतेशिवाय आणखी काय उरले आहे? शेवटी तुम्ही कोठे वळविले जात आहात?"

*(दिव्य कुरआन, १०: ३२)*

माणसांचा खरा पालनकर्ता, मालक, स्वामी अल्लाह आहे व त्याची उपासना, भक्ती करणे तुमचे कर्तव्य आहे. अल्लाहचे अस्तित्व हे काल्पनिक नाही. तो दार्शनिक सिद्धान्तांच्या आधारे नाही परंतु विश्वाच्या निर्मितीत त्याचा पुरावा आहे. अल्लाहची कृती गांभीर्याची असून चेष्टा नाही, मनोरंजनासाठी नाही.

संपूर्ण विश्वाचा विचार न करता फक्त मानवाच्या निर्मितीबाबतच विचार करु या. मनुष्य जे अन्न खातो त्यात माणसाचे बीज नसते. अन्न हे पोटात गेल्यावर कोठे रक्त तयार होते, काही हाडांत जाते, काहीं मांसल भागांत जाते, एका खास ठिकाणी पोहोचल्यानंतर वीर्यात रुपांतर होऊन शरीरा बाहेर पडते. त्यांत कोट्यवधी सुक्ष्म बीज असतात. एका स्त्री-बीजाशी संबध आल्याने मनुष्य तयार होण्याची प्रक्रिया सुरु होते. गर्भ धारणेचे वेळी बीज अतिसुक्ष्म असते. हे सूक्ष्म कण नऊ महीने व काही दिवस गर्भांत निरनिराळ्या बिकट समस्येंतून माणसाच्या लहान आकृतीत या दुनियेत प्रवेश करतो. तोच अल्लाह ठरवितो की या बालकाला जीवंत ठेवायचे की मृत अवस्थेत बाहेर पाठवायचे, तो कसा असेल, आंधळा, बहिरा, मुका, लुळा, चांगला अथवा अत्यंत सुस्वरुप देखणा! पुल्लिंगी असेल की स्त्रीलिंगी? कोण हुशार असेल कि बिनडोक! त्याचे आयुष्य किती असेल? काय काय त्याच्या नशिबात घडणार आहे हे पूर्वीच पोटांत असतानाच अल्लाह ठरवित असतो.

खऱ्या ईश्वराची उपासना करणारे तोटयांत राहूच शकत नाही. जगात इतर उपास्य खोटे आहे, त्यांचे अस्तित्व हे धोकादायक आहे कारण त्यांची उपासना करुन काही फायदा होणार नाही.

## ५३) अल्-वकीलु : प्रतिनिधी

"तुमच्याविरूद्ध मोठ्या फौजा गोळा झाल्या आहेत, त्यांची भीती बाळगा," तर हे ऐकून त्यांची श्रद्धा अधिक वृद्धिंगत झाली आणि ते उत्तरले की, "अल्लाह आमच्यासाठी पुरेसा आहे आणि तोच सर्वोत्कृष्ट कार्यसिद्धीस नेणारा आहे."
*(दिव्य कुरआन, ३:१७३)*

"अल्लाह त्या प्रत्येक गोष्टीची माहिती राखणारा आहे जी तुम्ही लोक करता. अल्लाहवर भिस्त ठेवा, अल्लाहच भिस्त ठेवण्यास पुरेसा आहे."
*(दिव्य कुरआन, ३३:२-३)*

माणसाने आपले सर्व व्यवहार अल्लाहच्या सुपूर्द करावे. मार्गदर्शनासाठी तो योग्य आहे आणि तोच जबाबदार आहे. त्याच्या मार्गदर्शनाखाली कोणतेही काम बिघडणार नाही. जे लोक त्यावर विश्वास ठेवतील, त्याचे मार्गदर्शन मागतील त्यांना इतरांच्या मदतीची गरज भासणार नाही.

'वकील' हा उर्दूतही सुपरिचित शब्द आहे. आपले काम वकिलाच्या हवाली करुन वाद मिटवण्यासाठी करतो. पुढील सर्व कामे वकील करतो. तुम्ही आपले प्रकरण जगांतील एकमेव वकिलाकडे देऊन तर बघा की तो सर्व काही व्यवस्थित करतो की नाही!

## ५४) अल-कविय्यु : शक्तिशाली, बलशाली

"या लोकांनी अल्लाहची कदरच ओळखली नाही जशी त्यांनी ओळखायला हवी होती. वस्तुस्थिती अशी आहे की शक्तिमान व प्रतिष्ठावान तर अल्लाहच आहे."
*(दिव्य कुरआन, २२:७४)*

अल्लाहची कृपा व दान त्याच्या स्वतःच्या कुवतीवर आहे, कुणी दुसऱ्यांच्या ताकदीवर नाही. कोणी अल्लाहकडून काही ही हिसकावून घेऊ शकत नाही अथवा कोणाला देण्यापासून रोखू शकत नाही.

अल्लाह केव्हाही एका इशाऱ्याने सर्व नास्तिकांना पराजित करु शकतो व त्याच्या पैगंबरांना वरचढ करु शकतो यांत ईमानधारकांची काय कमाल? म्हणून अल्लाहने हे कार्य पैगंबरांवर, पवित्र ग्रंथावर व तुला (तराजु) कायम करुन लोकांमध्ये पाठवून सोपविले आहे.

## ५५) अल-मतीनु-जुल कुव्वतिल मतीनु - सामर्थ्यवान

"अल्लाह तर स्वत:च उपजीविका देणारा आहे, मोठा शक्तिमान आणि जबरदस्त." *(दिव्य कुरआन, ५१:५८)*

ज्याला कोणी हलवू शकत नाही, ज्याला कोणी तोडू शकत नाही, ज्याचा कोणी पर्याय नाही असा अविचलित सामर्थ्यवान अल्लाह आहे.

"मी यांची दोरी लांबवीत आहे. माझी चाल मोठी जबरदस्त आहे." *(दिव्य कुरआन, ६८:४५)*

## ५६) अल्-वलिय्यु,अल्-मौला - मित्र, प्रबंधक, सहाय्यक, सांभाळणा

मित्रता काही मनाला समजवण्यासाठी नाही की कोणाला ही आपला मित्र करुन बसा. खरा मित्र तो आहे जो मैत्रीचा हक्क बजावेल.

"तुम्ही भूतलावरही विवश करणारे नाही व आकाशांतसुद्धा नाही. आणि अल्लाहपासून वाचविणारा कोणी रक्षक आणि सहायक तुमच्यासाठी नाही." *(दिव्य कुरआन, २९:२२)*

'ओहदच्या' युद्धाच्या वेळी अबू-सुफियानने घोषणा केली की आमच्याजवळ अुज्जा आहे. तुमच्याजवळ अुज्जा नाही त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सहकार्यांना सांगितले "तुम्ही उत्तर द्या. आमचा वाली व मद्दगार अल्लाह आहे. तुमचा वाली व मद्दगार कोणीही नाही. ईमानधारकांचा सहायक, मित्र, प्रबंधक व सांभाळणारा अल्लाह आहे. म्हणून दृढतापूर्वक त्याला धरुन ठेवा. जीवनातले सारे नियम पाळा. त्याचे अनुकरण करा. त्याचीच भिती बाळगा व आशाही बाळगा की तोच खरा मदद करणारा आहे, विश्वास फक्त अल्लाहवर ठेवा."

## ५७) अल्-हमीदु -
## स्तुत्य विशेषता धारण करणारा स्वत: वंद्य

"इब्राहीम (अ.) च्या कुटुंबियांनो, तुम्हावर तर अल्लाहची कृपा आणि त्याची समृद्धी आहे आणि निश्चितच अल्लाह अत्यंत प्रशंसेस पात्र व वैभवशाली आहे." *(दिव्य कुरआन, ११:७३)*

"त्याचेच आहे जे काही आकाशांत आहे आणि जे काही पृथ्वीत आहे. नि:संदेह तोच निरपेक्ष व स्तुत्य आहे." *(दिव्य कुरआन, २२:६४)*

जगात अल्लाहची स्तुती कोणी करो अगर ना करो तो स्वत:साठी प्रशंसनीय आहे कारण त्याचा खजिना तो स्वत:साठी न वापरता आपल्या दासांसाठीच वापरतो.

## ५८) अल-मुहसी - गणना करुन ठेवणारा

"आणि तो त्यांच्या संपूर्ण परिसराला वेढून आहे, आणि एकेका वस्तूची त्याने गणना करून ठेवली आहे." *(दिव्य कुरआन, ७२:२८)*

अल्लाहजवळ प्रत्येक माणसाची कर्मनोंद वही आहे. कोणत्या माणसाने केव्हा, कोठे व काय केले व त्याची नंतर प्रतिक्रिया काय होती, हे सर्व अल्लाहच्या दफ्तरांत व्यवस्थित नमूद करण्यांत येते.

माणसाच्या कर्मनोंद वहीत तीन प्रकारची नोंद होते. १) चांगले व वाईट कर्म लिहिले जातात. २) माणासाच्या अंगावर डोक्यातले कर्माचे लिखाण तयार होतील, प्रलयदिनी सर्व अवयव बोलू लागतील. ३) पुढील वंशावर माणसाने काय परिणाम केले, चांगले अथवा वाईट गोष्टीसाठी कारणीभूत ठरला त्याचा हिशेब ठेवला जात आहे.

याद राखा हे सर्व लिखाण, पुरावे जे अल्लाहने गणना करुन ठेवलेले आहेत माणसाला स्वर्ग अथवा नरकात पाठविण्यासाठी उपयुक्त ठरतील.

## ५९) अल-मुब्दियु - सुरुवातीलाच निर्माण करणारा

"त्याच्याकडेच तुम्हा सर्वांना परतावयाचे आहे, हे अल्लाहचे पक्के वचन आहे. नि:संशय निर्मितीचा प्रारंभ तोच करतो, मग तोच दुसऱ्यांदा निर्माण करील." *(दिव्य कुरआन, १०:४)*

जरा विचार करा. तुमची सुरुवात व तुमचा शेवट अल्लाहच्या हातात आहे तर मधल्या काळात तुम्ही त्याची उपासना का करीत नाही?

प्राण हाही अजून अल्लाहचा चमत्कार समजावा कारण, मनुष्य प्राण शोधण्यांत यशस्वी ठरला नाही. माणसाने D.N.A शोधून काढला तरी तो जीव नाही फक्त एक गुण आहे. माणसाव्यतिरिक्त दहा लाख पशुंची प्रजाती आहेत. एक अल्लाहला हे काम एका शब्दांत करणे शक्य आहे आणि तो शब्द आहे 'कुन'.

## ६०) अल्-मुईदु - दुसऱ्यादा जीवंत करणारा

दूसऱ्यांदा माणसाला जीवंत केले जाईल हा वाद होऊ शकत नाही कारण तर्क असे सांगतो की ज्याने पूर्वी जन्म दिला आहे त्याला पुन्हा जन्म देणे अगदी सहज शक्य आहे. पहिल्या जन्माचे सत्य नाकारता येत नाही.

"तोच आहे जो सृष्टीचा प्रारंभ करतो, मग तोच तिची पुनरावृत्ती करील आणि हे त्याच्यासाठी अधिक सुलभ आहे. आकाश आणि पृथ्वीत त्याचे गुणवैशिष्ठ्य सर्वात वरचढ आहे, आणि तो जबरदस्त आणि बुद्धिमान आहे."

*(दिव्य कुरआन, ३०:२७)*

## ६१) अल्-मुहई- जीवनदायी अल्लाह

"पाहा, अल्लाहच्या कृपेचे परिणाम की मृत पडलेल्या जमिनीला तो कशाप्रकारे जीवित करतो. निःसंशय तो मृतांना जीवन प्रदान करणारा आहे व तो प्रत्येक गोष्टीवर समर्थ आहे." *(दिव्य कुरआन, ३०:५०)*

नादान माणसे परलोकाला अशक्य समजतात व परत जीवंत होणे त्यांना मान्य नाही. प्रलयाच्या वेळेस मेलेली सर्व माणसे अल्लाहच्या एका इशाऱ्याने जीवंत होऊन हजर होतील जसे पावसाळ्यात मृत वनस्पती जगू लागते.

## ६२) अल्-मुमीतु - मृत्युदाता

'अल्लाहला तुम्ही कसे नाकारता? जेव्हा तुम्ही निर्जीव होतात तेव्हा त्याने तुम्हाला जीवन प्रदान केले. नंतर तोच तुमचे प्राण हरण करील. नंतर तुम्हाला पुनरुज्जीवन देईल. नंतर त्याच्याकडेच तुम्हाला परत जावयाचे आहे."

*(दिव्य कुरआन, २:२८)*

मनुष्य आपल्या जन्माबाबत नशीबाबाबत आणि मृत्युबाबत विवश

आहे. तो आपल्या इच्छेने जन्म घेऊ शकत नाही. ना आपल्या मृत्युला टाळु शकतो. त्याच्या मृत्युची वेळ, जागा, आणि कशाप्रकारे मरणार हे काही आपल्या हाती नाही.

मेल्यानंतर मनुष्य नष्ट होत नाही. आत्मा फक्त शरीरातुन काढला जातो व ईशदूत त्याला ताब्यात घेतो. या आत्म्याला प्रथमदिनी नवा जन्म दिला जाईल व अल्लाहपुढे उभा राहून त्याला हिशेब द्यावा लागेल.

## ६३) अल्-हय्यु - जीवंत अमर अस्तित्व स्वबळावर जीवंत अल्लाह

"अल्लाह तो चिरंजीवी अस्तित्व ज्याने सृष्टीची व्यवस्था सांभाळली आहे. खरोखरच त्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही."

*(दिव्य कुरआन, ३:२)*

अज्ञानी लोकांनी अल्लाहशिवाय कितीतरी उपास्य बनवून ठेवलेले आहेत. ईश्वर फक्त अल्लाह आहे जो स्वयंभू आहे जो सुरुवातीपासून स्वत: जीवंत आहे व त्याला मृत्यु नाही. व ज्याला मृत्यु नाही तोच उपास्य आहे. अल्लाहशिवाय सगळ्यांना मृत्यु अटळ आहे.

## ६४) अल्-कय्यूमु - स्वत:च्या शक्तीने कायम राहणारा व सृष्टीला सांभाळणारा

"त्याचे राज्य आकाश आणि पृथ्वीवर पसरले आहे, आणि त्यांचे संरक्षण काही त्याला थकवून सोडणारे काम नव्हे. फक्त तोच एकटा महान व श्रेष्ठ आहे." *(दिव्य कुरआन, २:२५५)*

ही अथांग सृष्टी अल्लाहच्या देखरेखीखाली कायम आहे. कोणी ईशदूत, जिन, ईशभक्त, ऋषीने ही सृष्टी सांभाळलेली नाही. हे सर्व तर आपला सांभाळही करु शकत नाही. यांच्यात कोणताही ईश अंश नाही.

## ६५) अल्-वाजिदु - अस्तित्व देणारा, घेणारा

हे शुभ नाव कुरआनमध्ये नाही व एक क्रिया सांगितली आहे जे लोक इन्कार करणारे आहेत त्यांची कर्मे वाया जाण्याचे उदाहरण असे आहे,

"जसे निर्जल वाळवंटातील मृगजळ, की तहानलेला त्याला पाणी समजून होता, परंतु तो जेव्हा तेथे पोहचला तेव्हा काहीही आढळले नाही, तर तेथे त्याला अल्लाह असलेला आढळला, ज्याने त्याचा हिशेब पुरेपूर चुकता केला आणि अल्लाहला हिशेब घेताना विलंब लागत नाही."

*(दिव्य कुरआन, २४:३९)*

जे लोक आपल्या खऱ्या स्वामीला मानीत नाहीत त्यांना त्यांच्या सत्कर्माचे फळच मिळणार नाही, त्यासाठी वरील उदाहरण दिले गेले आहे. त्यांना चांगल्या कर्माचे मृगजळ दिसेल परंतु तिथे काहीच नसेल.

## ६६) अल-माजिदु - श्रेष्ठ उत्तम महान

'मजीद' शब्दाचा अरबी भाषेत दोन प्रकारे वापर होतो. एक अतिउच्चकोटीचा, महान, प्रतिष्ठावान. दुसरा याअर्थी की तो अधिक लाभदायक होय. अशा उच्च दर्जाच्या अल्लाहबाबत दुःसाहस करणे मानवाला शोभत नाही.

"निश्चितच अल्लाह अत्यंत प्रशंसेस पात्र व वैभवशाली आहे."

*(दिव्य कुरआन, ११:७३)*

## ६७) अल्-वाहिदु, अल्-अहदु - एकमेव, एकटा, अद्वितीय

"हा एक संदेश आहे सर्व मानवांसाठी आणि हा पाठविला गेला आहे यासाठी की त्यांना याच्याद्वारे सावध केले जावे आणि त्यांनी जाणावे की वस्तुतः ईश्वर केवळ एकच आहे आणि जे बुद्धिमान आहेत त्यांनी (यावर) चिंतन करावे."

*(दिव्य कुरआन, १४:५२)*

"जर अल्लाह एखाद्याला पुत्र बनवू इच्छित असता तर आपल्या निर्मितीपैकी हवे त्याला निवडले असते, पवित्र आहे तो यापासून (की एखादा त्याचा पुत्र असावा), तो अल्लाह आहे एकमेव आणि सर्वांवर प्रभुत्वसंपन्न."

*(दिव्य कुरआन, ३९:४)*

जो आपल्यासारखा एकटा आहे. संतान एका जातीची असते त्याकरिता बायकोसुद्धा त्याच जातीची असायला हवी. तो मनुष्य अज्ञानी व मूर्ख असला पाहिजे जो अल्लाहसाठी पुत्राचा प्रस्ताव मांडतो.

अल्लाह एकमेव पालनहार आहे. ईश्वत्वात तो एकटाच सृष्टीचा मालक एकटाच. सदैव राहणारा तो एकटाच व नंतर कोणीही अल्लाह होणार नाही.

## ६८) अस-समदु - निरपेक्ष

"लोकहो! तुम्हीच अल्लाहचे गरजवंत आहात."

*(दिव्य कुरआन, ३५:१५)*

अरबी भाषेत 'समद' शब्दाचे अनेक अर्थ होतात. मदतीसाठी ज्याच्याकडे पाहिले जाते, सरदार ज्याचे शासन अंतिम असे, सगळे ज्याचे आश्रित आहेत असा. ज्याच्यावर कोणतेही संकट येत नाही. ज्याच्यात काही त्रुटी नाहीत.

'समद' हा शब्द प्राण्यांसाठी ही वापरला जातो पण तो अल्लाहकरिता 'अस्-समद' म्हणून वापरला जातो. तो कोणाचा मुहताज नसून सगळेच त्याचे आश्रित आहेत. तोच अन्नदाता आहे. कुणाकडून घेत नाही. साऱ्या सृष्टीवर त्याचे नेतृत्व आहे. अशी कोणी एकच व्यक्ती  असू शकते.

## ६९) अल्-कादीरु, अल्-कदीरु - पूर्ण सामर्थ्यवान, अति सामर्थ्यवान

"सांगा, तो याला समर्थ आहे की तुम्हावर एखादा प्रकोप वरून कोसळवेल, अथवा तुमच्या पायाखालून उसळवेल किंवा तुम्हाला गटागटांत विभागून एका गटाला दुसऱ्या गटांच्या शक्तीचा आस्वाद चाखवील. पहा, आम्ही कशाप्रकारे वरचेवर विविध पद्धतींनी आमची संकेतवचने यांच्यासमोर प्रस्तुत करीत आहोत की कदाचित यांना सत्य समजावे."

*(दिव्य कुरआन, ६:६५)*

जे लोक ईश संकट व यातनांना आपल्यापासून दूर समजून ऐश्वर्यात साहसवर साहस करीत असतात. त्यांना चेतावणी दिली आहे की अल्लाहचे संकट येण्यास जास्त वेळ लागणार नाही. वादळाचा एक तडाखा, धरणी-कंपाचा एक झटका, समुद्रातील एक सुनामी, अति सृष्टीने एक महापूर बर्बाद करु शकतो. वसाहतींचा नायनाट होऊ शकतो. तसेच मानवी युद्धांत एकमेकांना नाश करण्यात सर्वशक्ति खर्च होऊ शकते. जागतिक युद्धे कुणी विसरु शकेल काय?

अभिमानी माणसे या भ्रमात आहेत की या जगात माणसांच्या भाग्याचा निर्णय ते स्वत: करतील. अल्लाह एक उदाहरण देतो की जी शक्ती एक लहान बीजापासून एक विशालकाय झाड उभा करते तीच शक्ती त्या झाडाला सुकवून त्याला आगीच्या हवाली करते. अशा प्रकारे लोक पाहतात की जुलमी बादशहा, राज्यकर्ते, हिटलरसारख्या लोकांना कोणी हटवू शकले काय? अल्लाहने त्यांना असे पाडले की लोकांनी त्यापासून बोध घ्यावा. त्यांच्या बाबतींत असे घडणार असे कुणीही भाकित केले नव्हते.

पैगंबर ईसा (अ.) यांच्या चमत्कारिक जन्माने लोक अचंभित झाले, त्यांच्या आयुष्यातील चमत्काराने लोक प्रभावित झाले, परंतु अल्लाहच्या असंख्य निर्मितीत असंख्य चमत्कार पाहणाऱ्यांना ते दिसत नाही. पैगंबर ईसा (अ.) यांना लोकांनी अल्लाहचा मुलगा म्हणून संबोधू लागले. जे लोक निसर्गाच्या अदभूत गोष्टीकडे खुल्या नजरेने पाहतात त्यांनाच श्रद्धेचा प्रकाश दिसू शकतो.

## ७०) अल्-मुक़्तदिरु - ईश शक्तीवाला अल्लाह

''त्यांनी आमच्या सर्व संकेतांना खोटे ठरविले. सरतेशेवटी आम्ही त्यांना पकडले ज्याप्रमाणे एवादा जबरदस्त सामर्ध्यवान पकडीत असतो.''

*(दिव्य कुरआन, ५४:४२)*

अल्लाह जन्मही देतो. तो उन्नती व विकास प्रदान करतो व अवनती व पतन देतो. वसंत देऊन पतझड सुरु होतो. आज माणसाला सुख-समृद्धी प्राप्त आहे, तर पुढे काय अनर्थ होईल अल्लाह जाणे.

सृष्टीच्या सर्व व्यवस्थेवर त्याचाच अधिकार आहे. सूर्य व पृथ्वीचे भ्रमण त्याचे हातात आहे. चमकणाऱ्या सूर्याचा अस्त होऊन रात्रीचा अंधार पसरतो. अशाच प्रकारे पृथ्वीवर अध्यात्माचा उजेड त्याचे आदेशानेच येतो. सर्व प्रकारे घडणाऱ्या गोष्टीवर त्याचेच नियंत्रण असते.

## ७१) अल-मुकदिमु - पूर्वीच सचेत करणारा

''माझ्या पुढे भांडण करू नका, मी तुम्हाला अगोदरच वाईट परिणामांपासून खबरदार केले होते.'' *(दिव्य कुरआन, ५०:२८)*

पथभ्रष्ट मनुष्य व सैतान (दानव) दोन्ही अल्लाहसमोर उभे केले जातील. झगडणारा इसम म्हणेल "हे अल्लाह या सैतानाने मला पथभ्रष्ट केले व सतत माझ्या मागे लागून राहिला होता." सैतान उत्तरादाखल म्हणेल, "या मनुष्यावर काही माझा ताबा नव्हता. हा उदंडपणा मी बळजबरीने याचेवर लादलेला नाही. हा कमनशिबी स्वत: पुण्यापासून लांब व पापावर मोहीत झाला होता." अल्लाह म्हणेल मी पूर्वीच तुम्हाला सचेत केले होते की जो सत्यापासून भरकटेल तो आणि जो त्याला भरकटायला लावेल तो असे दोन्ही शिक्षेस पात्र असतील ती तुम्हाला मिळेलच.

## ७२) अल्-मुअख़्ख़िरु - वेळ देणारा, टाळणारा

"पैगंबरांनी सांगितले, "काय अल्लाहच्या बाबतीत शंका आहे जो आकाशांचा व पृथ्वीचा निर्माता आहे? तो तुम्हाला आवाहन करीत आहे की तुमचे अपराध माफ करावेत व तुम्हाला एका निश्चित कालावधीपर्यंत मोकळीक द्यावी."

*(दिव्य कुरआन, १४:१०)*

ठराविक मुदतचा अर्थ माणसाच्या मृत्युपर्यंत व दुसरा अर्थ कियामतचा आहे. एक चांगले राष्ट्र आपसात बिघाड करुन घेतले तर त्यांची कार्याची मुदत कमी करुन त्यांना नष्ट केले जाते, आणि जर आपल्या कार्यात सुधार केली तर मुदत वाढवून दिली जाते.

अल्लाह आपल्या कार्यात घाई करत नाही, तो असे कधीच करत नाही की पैगंबरांच्या आव्हानाला कोणी नकार दिला तर त्वरीत दंडीत करीत नाही. ईमानधारण करणाऱ्यांवर त्वरीत दंड करीत नाही. ही मुदत बरीच लांब असू शकते व ही मुदत अल्लाहला माहीत आहे. मुदत संपताच दंड सुरु होतो.

## ७३) अल-अव्वलु - सगळयात प्रथम

"तोच आदीही आहे आणि अंतिमसुद्धा. आणि प्रकटही आहे व अप्रकटसुद्धा. आणि त्याला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे."

*(दिव्य कुरआन, ५७:३)*

## ७४) अल-.आखिरु - सगळ्यात शेवटचा

जेव्हा काहीच नसेल तेव्हा तोच (अल्लाह) असेल. कुरआनात म्हटल्याप्रमाणे स्वर्गात व नरकांत जाणारे लोक अनंतकाळ जीवंत राहतील. मग अल्लाह कसा सगळ्यांत शेवटचा असेल. याचे उत्तर कुरआनने दिले आहे.

"प्रत्येक वस्तू नश्वर आहे केवळ त्या अस्तित्वाखेरीज, सत्ताधिकार त्याचाच आहे आणि त्याच्याकडेच तुम्ही सर्व परतविले जाणार आहात."

*(दिव्य कुरआन, २८:८८)*

दुसऱ्या भाषेत वैयक्तिक जीवन व स्थिरता कोणत्याही प्राण्यासाठी नाही. सर्व नश्वर आहेत व ते अल्लाहच्या आज्ञेशिवाय स्वर्गात अथवा नरकात जाणार नाहीत. त्या प्रवेशा नंतर अल्लाह त्यांना सर्वकालीन अनंत जीवन बहाल करेल.

असेच देवदूतांचे आहे. तेही नश्वर आहेत. जेव्हा अल्लाहची इच्छा झाली त्यांना निर्माण करण्यांत आले व जोपर्यंत अल्लाहची इच्छा असेल तोपर्यंत त्यांना जीवन मिळेल.

## ७५) अज-जाहिरु - प्रखरपणे प्रकट

जगात जे काही प्रकट झाले त्यांत अल्लाहची विशेषणे व अल्लाहचे तेज आहे.

## ७६) अल-बातिनु - अतिगुप्त

अल्लाहचे गुपित माणसाच्या चेतना, इंद्रियशक्तीच्या पलीकडे आहे. बुद्धी व कल्पनेने सत्य वस्तुस्थितीपर्यंत माणूस पोहचू शकत नाही.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी यावर भाष्य केले आहे. प्रार्थना करताना म्हटले आहे;

"तूच पहिला आहे कुणीही तुझ्या पूर्वी नाही.

तूच अंतिम आहे. तुझ्यानंतर कोणी नाही.

तूच प्रकट आहे, कोणी तुझ्यापेक्षा वरचढ नाही.

तूच अत्यंत गुप्त आहे, कोणीही तुझ्यापेक्षा गुप्त नाही."

## ७७) अल-वालियु - समर्थक व मददगार

"प्रत्येक माणसाच्या पुढे आणि मागे त्याने नियुक्त केलेले निरीक्षक लागून आहेत जे अल्लाहच्या आज्ञेने त्याच्यावर देखरेख करीत आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की अल्लाह कोणत्याही जनसमूहाच्या स्थितीत परिवर्तन करीत नाही जोपर्यंत तो स्वतः आपल्या गुणांना बदलत नाही आणि जेव्हा अल्लाहने एखाद्या जनसमूहावर अरिष्ट आणण्याचा निर्णय घेतला तेव्हा तो कोणाच्याही टाळल्याने टळू शकत नाही, आणि अल्लाहच्या विरोधात अशा जनसमूहाचा कोणी संरक्षक व मदतगारही असू शकत नाही."

*(दिव्य कुरआन, १३:११)*

अल्लाह हाच अधिकारी व स्वामी आहे. त्यालाच सर्व अधिकार आहेत. सहायता व मदत करणे, उपाय व भाग्य सर्व त्याचे हातात आहे तोच खऱ्या अर्थाने स्वामी आहे.

## ७८) अल्-मुतआलु - श्रेष्ठतम अल्लाह

"तो गुप्त आणि प्रकट प्रत्येक गोष्टीचा विज्ञाता आहे, तो महान आहे आणि प्रत्येक स्थितीत उच्चतर राहणारा आहे." *(दिव्य कुरआन, १३:९)*

अल्लाहचे नाव प्रत्येक श्रेष्ठ व्यक्तीपेक्षा श्रेष्ठतम आहे. उच्च प्रतिवादीला खालच्या पातळीवर पाठविणारा आहे. कुरआनमध्ये कित्येक ठिकाणी या नावाची पुनरावृत्ती केली आहे.

## ७९) अल् बर्रु, अल् बार्रु - महान उपकारी

"आम्ही पूर्वीच्या जीवनात त्याचाच धावा करीत होतो. तो खरोखरच मोठा उपकारी व दयावान आहे." *(दिव्य कुरआन, ५२:२८)*

तुमच्या नैसर्गिक गरजा अल्लाहने पूर्ण केल्या. आकाशांतून पाऊस पडेल. जमिनीतून निरनिराळया प्रकारची फळे, वनस्पती दिली. समुद्रापासून अन्न दिले. प्रवासाची साधने दिलीत. तुम्हाला पशुधन दिले प्रवासासाठी व त्यांच्या कातडीपासून केसापासून वस्त्र तयार करण्यासाठी पशू दिलेत. हे समजू नका की ही सर्व सुखसामुग्री कुणी दुसऱ्याने दिलीत. ही सर्व अल्लाहने दिलेली आहेत.

याद राखा, प्रलय दिनी तुम्हाला विचारले जाईल की सुखसामुग्री तुम्हाला मिळाली होती, तर तुम्ही त्याच्याशी कसा व्यवहार केला व कोणत्या प्रकारे उपकाराची फेड केली?

## ८०) अल्-तव्वाबु-माफी स्विकारणारा व माफी देणारा

'तौबा'चा अर्थ परत फिरणे. भक्त अल्लाहची माफी मागतो. म्हणजे योग्य तऱ्हेने भक्ती व उपासना करतो. पापमुक्त होणेसाठी प्रयत्न करतो व अल्लाह भक्ताने माफी मागितल्यामुळे भक्तावर कृपा करतो. अपराध व पाप केल्यानंतर जो भक्त अल्लाहपासून लांब गेला होता त्याला पश्चाताप झाल्याने तो माफी मागतो व अल्लाहची भक्तीभावाने उपासना करतो, अशा भक्ताबद्दल अल्लाहला आनंद होतो. ही परत फिरण्याची वेळमर्यादा जीवनाच्या शेवटी, मृत्युची चिन्हे दिसण्यापूर्वी पर्यंत आहे. एकदा मृत्यु चिन्ह दिसू लागले तर माफीचे द्वार बंद होतात.

माफीचा अर्थ असा की तुमच्याकडुन काही चूक झाली तर पश्चाताप करावा. अल्लाहपाशी माफी मागावी व पुन्हा हीच चूक होऊ नये म्हणून दृढनिश्चय करावा. तसेच इतरांचे हक्कावर गदा आणली असेल तर ते हक्क परत करावे. ज्याला दुःख पोहचवले असेल त्याची क्षमा मागावी. कोणाचे नुकसान केले असेल तर नुकसानभरपाई द्यावी.

## ८१) अल्-मुनतक़िमु - प्रतिशोध घेणारा अल्लाह

"त्याच्यापेक्षा मोठा अत्याचारी कोण असेल ज्याला त्याच्या पालनकर्त्याच्या संकेताने उपदेश केला जाईल आणि मग तो त्यापासून पराङमुख होईल. अशा अपराधींचा तर आम्ही सूड घेतल्याशिवाय राहणार नाही."

*(दिव्य कुरआन, ३२:२२)*

अल्लाहच्या आयती म्हणजे चिन्हे खालीलप्रमाणे पवित्र कुरआनात नमुद केल्या आहेत.

१. ती चिन्हें जी जमिनीपासून आकाशापर्यंतच्या यंत्रणेत आढळतात.

२. ती चिन्हें जी मनुष्याच्या उत्पत्ती व रचनेच्या गुंतागुंतीत आढळतात.

३. ती चिन्हें त्याच्या अंर्तज्ञानात, अचेतन मन व अवचेतना व नैतिक कल्पनेत

आढळतात.

४. ती चिन्हें जी माणसाच्या इतिहासात वारंवार आढळतात.

५. ती चिन्हें नैसर्गिक आपत्ती, जी जमिनीवर व आकाशातुन तुटून पडतात.

६. अल्लाहने आपल्या रसूल व पैगंबराद्वारे पाठविलेला संदेशामार्फत तुम्हाला सत्याचे भान करुन दिले.

## ८२) अल्-अफ़ुव्वु- माफ करणारा

"अल्लाह अवश्य (त्यांच्या बाबतीत) क्षमाशील व परम दयाळू आहे." *(दिव्य कुरआन, २४:५)*

अल्लाहचे तुम्ही दास आहात. तो माफ करणारा आहे. यामुळे तुम्हीही जिथपर्यंत जमेल माफी देत राहा. इमानधारकांच्या नैतिकतेत भर पडते. बदला घेण्याचा हक्क जरुर आहे परंतु प्रतिशोध भावना न ठेवणे जास्त उचित आहे.

"हे लोक एक अत्यंत अप्रिय आणि खोटी गोष्ट बोलत आहेत, आणि वास्तविकता अशी आहे की अल्लाह मोठा माफ करणारा व क्षमाशील आहे."
*(दिव्य कुरआन, ५८:२)*

या बाबतीत अल्लाहने दंड असा दिला की साठ लोकांना जेवण द्यावे अथवा साठ दिवस उपवास करावा म्हणजे आत्मशुद्धी होईल.

## ८३) अर् रऊफ - प्रेमळ माफ करणारा

"परंतु त्यांच्यासाठी मुळीच कठीण सिद्ध झाली नाही ज्यांना अल्लाहचे मार्गदर्शन लाभले. अल्लाह तुमची ही श्रद्धा कदापि व्यर्थ जाऊ देणार नाही. विश्वास ठेवा कि तो लोकांसाठी अत्यंत करुणावंत आणि कृपावंत आहे."
*(दिव्य कुरआन, २:१४३)*

अल्लाह तुमचा शुभचिंतक आहे म्हणून वेळेआधी तुम्हाला सूचित करीत आहे की त्यामुळे तुमचा अंत चांगला होतो.

आणखी काही आयती येथे देण्यात येत आहेत.

सूरह आले इमरान : आयत - ३०, सूरह तौबा : आयत -११७, सूरह हज:: आयत - ६५

## ८४) मालिकुल मुल्क - जगतस्वामी

विश्वाचा मालक अल्लाह आहे. त्याच्या साम्राज्यात तो एकटा आहे. त्याला इतरांच्या मदतीची गरज नाही. असा लोकांचा समज की इतर मदतनीस असतील चुकीचे आहे.

अनेकेश्वरवादी निरनिराळ्या देव व संत पुरुषांना असे समजतात की ते विश्वाच्या देखरेखीत सामिल आहेत तेही हातभार लावतात. परंतु असे काही नाही. अल्लाह समर्थ आहे व तोच जगतस्वामी म्हणून सर्व बाबी समर्थपणे हाताळतो आहे. त्याला सहाय्यकांची गरज नाही.

## ८५) जुल-जलाली वल-इकरामु - महान व दानशील

"अत्यंत समृद्धशाली आहे तुझ्या प्रतापी व उदार पालनकर्त्याचे नाव."

*(दिव्य कुरआन, ५५:७८)*

अमर व शक्तिशाली अल्लाह आहे. ज्याच्या महानतेची ही सृष्टी साक्ष आहे. माणसाला सुखसामुग्री व कृपा जी मिळत आहे यातच समाधानी राहावे, अभिमान बाळगू नये. ही पृथ्वी सृष्टीच्या तुलनेत मटारच्या दाण्याच्या आकाराबरोबर सुद्धा नाही, पृथ्वीच्या एका कोपऱ्यात पाच-पंचवीस अनुयायी गोळा करुन ईश्वरी ढोंग रचला तर तो किती दिवस टिकेल? तरी सावध राहा. खऱ्या अल्लाहला ओळखा.

## ८६) अल-मुक्सितु - न्याय देणारा

स्पष्टीकरणासाठी पान २६ पहावे.

अनुक्रमांक ३० पाहावे "अल्-अदलु "

## ८७) अल-जामिअु - एकत्र करणारा

"अल्लाह ज्याच्याशिवाय अन्य कोणीही ईश्वर नाही, तो तुम्हा सर्वांना त्या पुनरुत्थानाच्या दिवशी एकत्र करील ज्याच्या येण्यात कोणताही संशय नाही, आणि अल्लाहच्या वचनापेक्षा अधिक खरी गोष्ट कोणाची बरे असू शकेल?"

*(दिव्य कुरआन, ४:८७)*

नास्तिक अनेकेश्वरवादी आणि निधर्मी जे काही करीत आहेत त्याने अल्लाहचे काहीही बिघडत नाही. हे सत्य आहे की एक अल्लाह ही वास्तविकता आहे. तो सर्वांना एके दिवशी एकत्र आणील व प्रत्येकाच्या कर्माप्रमाणे त्याचे होणारे परिणाम दाखवून देईल. कोणीही पळून जाऊ शकणार नाही.

प्रलयाचा दिवस हा आध्यात्मिक दिवस नसेल, तर प्रत्यक्षात मनुष्य त्याच प्रकारे हाडा-मासांत असेल. त्याचे शरीर व आत्मा या दुनियेसारखेच असेल. प्रत्येक अवयव नि अवयव तंतोतंत पृथ्वीवर असलेल्या शरीरासारखे असेल व ते सर्व अल्लाहच्या आदेशाने प्रकट होतील. सर्वांना एकत्र करणे अल्लाहला सहज शक्य आहे.

## ८८) अल-गनिय्यु - स्वसंपन्न (स्वयंसिद्ध)

'गनी' चा अर्थ असा की तो प्रत्येक गोष्टीचा मालक आहे. दुसऱ्याच्या मदतीची त्याला गरज नाही. तो सर्वांच्या गरजापुऱ्या करतो. त्याला याचीही गरज नाही की स्वतःची मुले निर्माण करावी, मुले व मुली तर नश्वर माणसाची गरज आहे.

अल्लाह फर्मावितो, "हे माझ्या दासांनो! पूर्वीपासून ते आतापर्यंतचे सर्व मानव, जिन्न सर्व सदाचारी झालेत तर माझ्या सम्राज्यात काहीही वाढ होणार नाही. तसेच पूर्वीपासून ते आजतागायत सर्व मानव व जिन्न दुराचारी झालेत, तर माझ्या साम्राज्यात काही ही कमी होणार नाही. हे माझ्या दासांनो! तुमचे कर्मच मी मोजतो व त्याप्रमाणे तुम्हाला मोबदला देतो. म्हणून यशस्वी होणाऱ्यांना त्यांच्या सत्कर्माबाबत शुभेच्छा व त्या व्यतिरित अयशस्वी होणाऱ्यांनी स्वतः तिरस्कार करुन घ्यावा." (अल्लाहचे वचन (हदीसे-कुदसी)

## ८९) अल् मुग़नी - लालसारहित करणारा

"आणि तुम्ही गरीब आढळला. आणि मग श्रीमंत केले."

*(दिव्य कुरआन, ९३:८)*

पैगंबर मुहम्मद (स.) यांना संपत्तीचा वारसा फक्त एक उंट व दासी

मिळाला. सुरुवातीचे आयुष्य गरिबीत गेले. त्यानंतर श्रीमंत विधवेबरोबर लग्न केले व व्यापार-धंद्यात मदत केली अशा प्रकारे व्यापारात भरभराट झाली.

## ९०) अल-मानेअु-अल्लाहच्या दानाला रोखणार कोण? अल्लाह रोखणार तर देणार कोण?

पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या प्रार्थनेत अल्लाहपाशी खालील शब्दांत दुआ करीत : "हे अल्लाह, कोणी रोखणारा नाही ज्याला तू देणार आणि कोणी देणारा नाही ज्याला तू रोखणार. तुझ्या बढाईच्या तुलनेत दुसऱ्याची बढाई लाभ पोहचवू शकत नाही."

## ९१) अज्-जार्रु - हानीचा मालक

"जर अल्लाहने तुम्हाला एखाद्या प्रकारची हानी पोहोचवली तर त्याच्याशिवाय इतर असा कोणीच नाही जो तुम्हाला त्या हानीपासून वाचवू शकेल. आणि जर त्याने तुम्हाला एखाद्या चांगल्या गोष्टीने उपकृत केले तर त्याला प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य प्राप्त आहे." *(दिव्य कुरआन, ६:१७)*

प्रत्येक माणसाला हे समजायला हवे की अल्लाहच्या हुकूमाशिवाय कोणीही त्याचे नुकसान करु शकत नाही. ही श्रद्धा त्याच्या मनात पक्की बसली की काल्पनिक भयापासून तो मुक्त होईल. संतुष्ट मनाने तो आपले कार्य करु लागेल. अल्लाहवर पूर्ण विश्वास केल्याने तो शांतपणे जगतो.

अल्लाहशिवाय इतर उपास्यांच्या अखत्यारीत काही नाही. ते कुणाचे भलेही करु शकत नाहीत व कुणाचे वाईटही करु शकत नाही.

सुख, दुःख अल्लाहकडून बहाल होतात. चांगले व वाईट नशीब त्याच्याच हाती आहे. दुसरी कोणतीही ताकद अशी नाही जी यांत ढवळाढवळ करु शकेल.

## ९२) अन-नाफिअु - नफा देणारा

नफा देणारी व्यक्ती फक्त अल्लाह आहे. जगातील इतर उपास्य नफा अथवा तोटा पोहचवू शकत नाहीत. त्यांची उपासना करुन प्रार्थना करुन स्वतःची श्रद्धा गमावून बसतात. फायदा तर होत नाही, नुकसान मात्र करुन घेतात.

अनेकेश्वरवादी माणसांचा हा भ्रम की अल्लाहजवळही महापुरुष त्यांच्या जोरावर अल्लाहपाशी अडवून कामे करुन घेतील, चुकीचे आहे. त्यांनी कोणत्याही भ्रमांत राहू नये. कितीही मोठा महापुरुष, संत, पैगंबर, अवलिया असो अल्लाहच्या दरबारात तोंड उघडण्यासाठी पूर्व परवानगीची गरज असते.

"तर कोण तुमच्या बाबतीत अल्लाहचा निर्णय रोखण्याचा जरासुद्धा अधिकार बाळगतो, जर तो तुम्हाला काही नुकसान पोहचवू इच्छित असेल अथवा लाभ प्रदान करू इच्छित असेल? तुमच्या कृत्याची तर अल्लाहच खबर राखणारा आहे." *(दिव्य कुरआन, ४८:११)*

## ९३) अन-नूरु, अल-मुनीरु, नूरुस समावति वल अर्द - साऱ्या विश्वाचे तेज

"अल्लाह आकाशांचा व पृथ्वीचा प्रकाश आहे."

*(दिव्य कुरआन, २४:३५)*

आकाश व जमीन हा शब्दप्रयोग पूर्ण विश्वासाठी होतो. म्हणजेच साऱ्या विश्वांत अल्लाहचा नूर आहे. 'नूर' चा अर्थ वस्तूंचे प्रकट होणे. म्हणजे स्व:तही व दुसऱ्या वस्तुंना प्रकट करणे. माणसांच्या अकलेत हाच अर्थ आहे. नासमजून येणाऱ्या गोष्टीला अंधकार, तिमिर म्हणतात. अल्लाहकरिता हा शब्द 'किरण' जे प्रति सेकंड १ लक्ष ८६ हजार मैल वेगाने प्रवास करते, ते नसून विश्वांत प्रकट होण्य़ाचे संकेत आहे. 'नूर' हा शब्द ज्ञानासाठी ही वापरला जातो, व हे ज्ञान अल्लाहमार्फतच मिळू शकते.

एक उदाहरण म्हणून म्हटले आहे की अल्लाह दीपक असून विश्वाला 'मेहराब' संबोधिले आहे. दिवा काचेच्या 'फानूस' मध्ये असावा. 'फानूस' असा पडदा आहे ज्यांच्यात अल्लाहने स्वत: विश्वापासून लपवून ठेवलेले आहे. जग त्याला पाहू शकत नाही.

## ९४) अल-हादियु - मार्गदर्शक

"ज्याला अल्लाहने मार्गदर्शनापासून वंचित केले त्याच्याकरिता मग कोणीच मार्गदर्शक नाही, आणि अल्लाह त्यांना दुर्वर्तनातच भटकलेल्या अवस्थेत सोडून देतो." *(दिव्य कुरआन, ७:१८६)*

इस्लामी आंदोलनाच्या वेळी सत्य व असत्य या दरम्यान वैमनस्य वाद-विवाद सुरु असताना पैगंबर व त्यांचे अनुयायी यांना धीर दिला जातो. अल्लाहकडून वारंवार संदेश येतो, त्यामुळे मनुष्य विचार करतो की अल्लाहचे लक्ष त्यांच्याकडे आहे व तो अभिरुची दाखवीत आहे, कठीण समयी मदतीला धावून येत आहे. हे पाहून माणूस उत्साही होतो.

जगात विचार व कार्यप्रणाली अल्लाहच्या अधिकारांत आहे. माणसाच्या प्रयत्नावर व इच्छेवर मार्ग निश्चित होतो. चांगल्या मार्गावर प्रयत्न केल्याने अल्लाह त्याला तसा योग देतो. त्याविरुद्ध पथभ्रष्ट माणसाला तो पथप्रदर्शन करीत नाही. त्या माणसाला शोधूनसुद्धा चांगला मार्ग सापडत नाही. त्याने स्वत:च सरळ मार्ग गमावला आहे.

अल्लाहने माणसाच्या अंत:करणांत ईश संकेत पाठवण्याची तरतूद केलेली आहे. अवचेतन मनांत चांगले व वाईटचा फरकासाठी चेतना दिलेली आहे. अंतरात्मा दिला आहे जो कूकर्म केल्यावर निंदा करतो.

निसर्गात अल्लाह सर्वांना मार्गदर्शन करतो. पाण्यांतील मासा आपोआप तरंगतो, पोहतो, मधमाशीला आपले पोळ बनविणे जमते, पक्षी आपले घरटे बांधतो. माणसाला जन्मजात आईचे दूध पिणे ना शिकवता जमते. पक्षीला उडणे सहज शक्य होते. माणसाच्या मनांत बरेच असे विचार येतात. चांगल्या व वाईट गोष्टींचे ईश संकेत मार्गदर्शनासाठी मिळत असतात..

माणसाच्या मार्गदर्शनासाठी पैगंबर अवतरले. पुस्तके अवतरली. कोणता मार्ग सरळ व सोपा आहे हे दाखवून दिले. जगातील प्रत्येक भागांत, वस्तीत अल्लाहची कल्पना, परलोकाची कल्पना व त्यासंबधी इतर माहिति पोहोचलेली आहे कोणीही अज्ञानी नाही.

## ९५) अल्-बदीअु - बदीअुस - समावाति वल- अर्द - आकाश व पृथ्वीचा अविष्कारक

''तोच आकाश आणि पृथ्वीचा प्रवर्तक आहे. जेव्हा एखादी घटना घटित करण्याचे इच्छितो तेव्हा फक्त म्हणतो, ''तथास्तु'' आणि क्षणार्धात तसे घडते.''

*(दिव्य कुरआन, २:११७)*

आकाशांत असंख्य नक्षत्रे व तारकापुंज अदृष्य अशा सहाऱ्यांनी भ्रमण

करीत आहेत. विश्वांत अशी शक्ती आहे जी सगळ्यांना व्यवस्थितपणे धरुन ठेवले आहे व जमिनीवर पडू देत नाही. आखून दिलेल्या मार्गावर सर्व ग्रह फिरत आहेत. सृष्टीचा निर्माता एवढे सारे रचून कुठे जाऊन झोपला नाही. त्याला तर साधी डुलकीही येत नाही. तोच सगळ्यांचा शासक आहे.

## ९६) अल-बाकियु - बाकी असणारा अल्लाह

"प्रत्येक वस्तू जी या पृथ्वीवर आहे लोप पावणारी आहे आणि तुझ्या पालनकर्त्याचे प्रतापी आणि उदार रूपच तेवढे बाकी राहणार आहे."

*(दिव्य कुरआन, ५५:२६-२७)*

अमर्त्य फक्त अल्लाह आहे. बाकी सर्व नश्वर आहेत. अल्लाहशिवाय माणसाने जे उपास्य उभे केले आहे उदा. सूर्य, चंद्र, नद्या, संत, महात्मे, मूर्ती, सर्प, झाडे इ. कोणीही तुमची इच्छा पुरी करु शकत नाही. ते स्वतः विवश आहेत. जे काही घडत आहे, होत आहे ते फक्त अल्लाहच्या इच्छेनुसारच होत आहे. कोणीही त्यांत ढवळाढवळ करु शकत नाही.

## ९७) अल्-वारिसु - खरा वारसदार

"जीवन आणि मरण आम्ही देतो आणि आम्हीच सर्वांचे वारस होणार आहोत." *(दिव्य कुरआन, १५:२३)*

म्हणजेच सर्वांवर अल्लाह बाकी राहील. माणसांनी जे काही मिळवलेले आहे ते तात्पुरते वापरण्यासाठी मिळाले आहेत. या सर्व गोष्टी, मालमत्ता, घरे-दारे सर्व सोडून रिकाम्या हाताने परत जावे लागेल व सर्व शेष अल्लाहच्या खजिन्यांत जमा होईल.

जगातील मालमत्ता माणसाकडे कायम राहणार नाही. ती सोडून जावे लागेल. यामुळे जर तुम्ही अल्लाहकरिता दान-धर्म देऊन खर्च केले, तर त्याचा मोबदला पुढील काळात (प्रलयकाळी) मिळेल जेव्हा त्याची अत्यंत जरुरी राहील.

## ९८) अर् रशीदु, अर राशिदु - मार्गदर्शक

जगात माणसाची गरज इतकीच नाही की, त्याला भोजन, अंगावर वस्त्र, राहण्यासाठी निवारा व संकटापासून बचाव मिळावा, परंतु खरी गरज अशी की जीवन जगण्याची कला त्याला अवगत व्हावी त्यासाठी त्याला मार्गदर्शनाची गरज आहे. जो जगण्याचे सर्व कायदे समजावून जीवन सफल करु शकतो व हे कार्य कोणी अन्य करु शकत नाही. शिवाय अल्लाह तोच तो खरा मार्गदर्शक आहे.

## ९९) अस- सबूरु - धैर्यवान व संतोषी

पवित्र कुरआनमध्ये हे शुभ नाव आलेले नाही.

अतिसंतोषी व धैर्यवान अल्लाह.

# अल्लाहची काही अतिरिक्त नावे

## १) अर रबु - स्वामी, पालनहार, शासक

"स्तवन फक्त अल्लाहसाठीच आहे जो सर्व सृष्टीचा रब (पालनकर्ता) आहे." *(दिव्य कुरआन, १:१)*

"अल्लाहचा आश्रय, माझ्या पालनकर्त्याने तर मला चांगला दर्जा बहाल केला" *(दिव्य कुरआन, १२:२३)*

१. "सर्व जगांच्या एका पालनकर्त्या व्यतिरिक्त, ज्याने मला निर्माण केले मग तोच मला मार्गदर्शन करतो. जो मला खाऊ व पिऊ घालतो."

*(दिव्य कुरआन, २६:७७-७९)*

२. "तोच तुमचा पालनकर्ता आहे आणि त्याच्याकडे तुम्हाला परतावयाचे आहे." *(दिव्य कुरआन, ११:३४)*

४. "वास्तविक पाहता त्यांना एक उपास्याशिवाय इतर कोणाचीही भक्ती करण्याचा आदेश दिला गेला नव्हता, तो ज्याच्यशिवाय इतर कोणीही भक्तीचा अधिकारी नाही." *(दिव्य कुरआन, ९:३१)*

५. "या घराच्या पालनकर्त्याची उपासना करावी ज्याने त्यांना भूकेपासून वाचवून, खायला दिले, आणि भयापासून वाचवून शांती प्रदान केली." *(दिव्य कुरआन, १०६:३-४)*

## २) अल्-काफियु - पर्याप्त असणारा

"(हे पैगंबर (स.)) काय अल्लाह आपल्या दासांसाठी पुरेसा नाही?" *(दिव्य कुरआन, ३९:३६)*

अल्लाह आपल्या ईश व्यवस्थेसाठी पर्याप्त आहे. त्याला कुणाच्याही मदतीची गरज नाही. कुणाला आपला पुत्र बनविण्याची आवश्यकता नाही.

## ३) अल्-फ़ातिरु, फातिरिस- समावाति वल अर्द- सृष्टी रचयता

“त्या अल्लाहला सोडून जो आकाश व पृथ्वीचा निर्माता आहे. तो उपजीविका देतो.” *(दिव्य कुरआन, ६:१४)*

अनेकेश्वरवादी लोकांना अल्लाहशिवाय इतर उपास्य बनविले ते उपास्य लोकांकडूनच खाद्य घेतात. फराहो (फिरऔन) राजा ठाठ जमऊ शकत नव्हता जोपर्यंत लोकांकडून दक्षिणा व कर वसूल होत नाही. संतपुरुषाच्या समाधीसाठी लोकांकडूनच समाधी बांधली जाते. पुजारी मूर्ती तयार करुन मंडपाची सजावट करुन मग पूजा-पाठ करतात. कोणतेही उपास्य स्वत: काही निर्माण करीत नाही.

फक्त अल्लाहच खरा ईश्वर आहे जो स्वत: निर्मिती करतो. कुणाचीही मदत घेत नाही.

## ४) अश-शदीदु, शदीदुल-इकाब-कठोर शिक्षा करणारा

या विशेषणाबाबत लोकांना सचेत केले गेले आहे की अल्लाह जितका कृपालू व दयाळू आहे तितकाच अवज्ञा करण्यासाठी कठीण आहे. त्याची शिक्षा इतकी भयावह आहे कुणी ती सहन करु शकणार नाही.

“जे काही पैगंबर तुम्हाला देईल ते घ्या आणि ज्या गोष्टीची तो तुम्हाला मनाई करील त्यापासून अलिप्त रहा. अल्लाहच्या प्रकोपाचे भय बाळगा, अल्लाह कठोर शिक्षा देणारा आहे.” *(दिव्य कुरआन, ५९:७)*

## ५) अल्-क़रीबु - अतिजवळ असणारा अल्लाह

“आम्ही मनुष्याला निर्माण केले आहे आणि त्यांच्या मनात उद्भवणारे ‘वसवसे’सुद्धा आम्ही जाणतो. आम्ही त्याच्या मानेच्या शिरेपेक्षाही अधिक त्याच्याजवळ आहोत.” *(दिव्य कुरआन, ५०:१६)*

अर्थात अल्लाहच्या सामर्थ्याने माणसाला आतून व बाहेरुन घेरुन ठेवले आहे. त्याची गोष्ट एकण्यासाठी अल्लाहला बाहेरुन चालत यावे लागत नाही. माणसाच्या मनातील विचार अल्लाहला कळतात. माणसाला पकडण्यासाठी अल्लाहची इच्छा बस आहे.

## ६) अल्-मुगीसु - सहाय्यता करणारा

जेव्हा माणसावर संकट येते अथवा मृत्यु साक्षात पुढे असतो त्या वेळेला अल्लाहशिवाय दुसरा आश्रय दिसत नाही. मोठ मोठे अनेकेश्वरवादी त्यांच्या उपास्यांना विसरुन एकच अल्लाहला पुकारु लागतात. ही गोष्ट अरबस्थानच्या पूर्वीच्या अरबापर्यंत मर्यादित नाही. ही गोष्ट ईश्वरावर श्रद्धा न ठेवणारे कम्युनिष्ट रशियांनासुद्धा लागू होते की महायुद्धांत जेव्हा जर्मन सैन्यांलाच वेढा पडला तेव्हा ते अल्लाहला पुकारु लागले.

वरील प्रकारची बऱ्याच घटना इतिहासात नमूद केलेल्या आढळतील.

## ७) अल्-क़ाइमु -अल्-क़ाइमु बिल किस्त- न्यायाचा शासक अल्लाह

''अल्लाहने स्वत: या गोष्टीची ग्वाही दिली आहे की त्याच्याशिवाय कोणीही परमेश्वर नाही, आणि फरिश्ते व सर्व ज्ञान राखणारेसुद्धा रास्त व न्यायनीतीने यांची ग्वाही देतात की, त्या प्रभावशाली बुद्धीमंताशिवाय खरे पाहता कोणीही ईश्वर नाही.'' *(दिव्य कुरआन, ३:१८)*

## ८) अल्-मन्नानु - कृतज्ञ अल्लाह

''पैगंबरांनी त्यांना सांगितले, ''खरोखरच आम्ही काहीच नाही परंतु तुमच्याचसारखे मानव. परंतु अल्लाह आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो त्याला उपकृत करतो.'' *(दिव्य कुरआन, १४:११)*

अल्लाहच्या पैगंबरानी त्यांच्यावर अल्लाहच्या उपकाराच्या उल्लेख केला आहे. ही आमच्या अखत्यारीची बाब नाही. हे अल्लाहच्या इच्छेनुसार झाले आहे.

पैगंबर युसूफ (अ.) यांनी आपल्या भावडांना सांगितले की अल्लाहने माझ्यावर उपकार केले नसते, तर मी वाळवंटातील पशु चारणारा धनगर आज या उच्च ठिकाणी कसा पोहचलो असतो. हे उच्च पद मला अल्लाहने बहाल केले आहे.

## ९) अल-काफीलु - जामीन

"अल्लाहचे करार पूर्ण करा जेव्हा तुम्ही त्याच्याशी एखादा करार केलेला असेल आणि आपल्या शपथा पक्क्या केल्यानंतर मोडून टाकू नका ज्याअर्थी तुम्ही अल्लाहला आपल्यावर साक्षीदार बनविले आहे. अल्लाहला तुमची सर्व कृत्ये माहित आहेत." *(दिव्य कुरआन, १६:९१)*

१. अल्लाहशी केलेला करार सर्वांत महत्त्वाचा आहे.

२. एका माणसाने दुसऱ्या माणसाशी केलेला करार असून त्यावर अल्लाहचे नाव घेतले आहे. अल्लाहची शपथ घेतली आहे.

३. तिसरा प्रकार असा की अल्लाहची शपथ न घेता करार केलेला आहे.

वरील तिन्ही प्रकारांत नैतिकता जपावी लागेल. सत्यनिष्ठा व न्याय पाळावा लागेल. कोणी या जगात नैतिकता पाळली नाही तर अल्लाहच्या न्यायालयात शेवटी त्याला जबाब द्यावा लागेल हे निश्चित.

## १०) अर्-रफ़ीअु , रफ़ीअुद - दर्जांत उच्चतम श्रेणीचा अल्लाह

"तो उच्च दर्जे राखणारा, सिंहासना (अर्श) चा स्वामी आहे."

*(दिव्य कुरआन, ४०:१५)*

अस्तित्वात असलेल्या तमाम गोष्टीत अल्लाहचा दर्जा श्रेष्ठ. संत असो, पैगंबर असो अथवा आणखी कुणी असो अल्लाहपेक्षा श्रेष्ठ असूच शकत नाही. अल्लाहच्या उच्चतम श्रेणीबाबत कोणी विचारही करु शकत नाही.

## ११) अल्-मुहीतु - व्यापक सर्व शक्तीनिशी घेरणारा

"आकाशात व पृथ्वीत जे काही आहे ते अल्लाहचे आहे आणि प्रत्येक वस्तू अल्लाहने व्यापिली आहे." *(दिव्य कुरआन, ४:१२६)*

पैगंबर व दूत (फरिश्ते) सुद्धा अल्लाहच्या घेऱ्यात आहे. तसूभरही ते इकडे तिकडे करु शकत नाही. जे संदेश त्यांना मिळाले आहेत त्यातला शब्द नि:शब्द मोजलेला आहे. कुणाची हिंमत नाही की त्यांत फेरबदल-कमी जास्त करु शकेल.

मनुष्य जरी अल्लाह पुढे नतमस्तक झाला नाही तरी अल्लाहच्या पकडीतून तो सुटू शकत नाही.

## १२) अन्-नसीरु - समर्थक व मदत करणारा

मूर्ख व अज्ञानी लोक समजतात की त्यांचे या जगातील उपास्य त्यांना या जगात व नंतर त्यांना मदत करतील. ते या भ्रमात आहे कारण उपास्याजवळ स्वत:ची काही शक्ती नाही व त्यांनी अल्लाहविरुद्ध विद्रोह पुकारलेला आहे.

"तुम्ही भूतलावरही विवश करणारे नाही व आकाशांतसुद्धा नाही. आणि अल्लाहपासून वाचविणारा कोणी रक्षक आणि सहायक तुमच्यासाठी नाही." *(दिव्य कुरआन, २९:२२)*

## १३) ज़ुत्-तौलि - महान कृपाळू, दयावान धनी व उदार

अल्लाहचे अनंत उपकाराची वर्षा माणसावर होतच राहते. माणसांना जे काही मिळत आहे त्याचीच असीम कृपा आहे.

## १४) अल-मुबीन - स्पष्टवादी असंदिग्ध सांगणारा

"त्या दिवशी अल्लाह तो बदला त्यांना पुरेपूर देईल ज्याला ते पात्र आहेत आणि त्यांना माहीत होईल की अल्लाहच सत्य आहे, खऱ्याला खरे करून दाखविणारा." *(दिव्य कुरआन, २४:२५)*

आपल्या आदेशांत शिकवणीत, आज्ञेत तो असंदिग्ध वक्तव्ये करतो. खरा आणि खोटा यांतील फरक उघडून सांगतो.

## १५) अस् सरीअु : सरीअुल् - हिसाब - तात्काळ हिशेब घेणारा

"हेच ते लोक आहेत ज्यांनी आपल्या कर्मानुसार जे प्राप्त केले आहे त्यानुसार त्यांचा हिस्सा आहे आणि अल्लाह लवकरच हिशोब घेणार आहे." *(दिव्य कुरआन, २:२०२)*

अल्लाहला विश्वांत सगळयांना एकाच वेळी अन्न पुरवणे काही कठीण जात नाही. विश्वांतील प्रत्येक गोष्टीवर त्याची नजर आहे. सगळ्या आवाजांना एकाच वेळी तो ऐकत आहे. तो प्रत्येकाचा हिशेब त्वरित करण्यास समर्थ आहे.

प्रलयदिनी सर्वांचा हिशेब करण्यास त्याला वेळ लागणार नाही, एवढेच काय ते कर्मपत्र प्रत्येकाच्या हातात असेल.

## १६) अल्-मुअ़ीनुल-मुस्तअ़ान - समर्थक-सहाय्यक

"पैगंबर (स.) यांनी सांगितले, "हे माझ्या पालनकर्त्या! सत्यानिशी निर्णय कर आणि हे लोकहो, तुम्ही ज्या गोष्टी रचीत आहात त्यांच्या विरोधात आमचा दयाळू पालनकर्ता आमच्यासाठी मदतीचा आधार आहे."

*(दिव्य कुरआन, २१:११२)*

"आम्ही तुझीच बंदगी (भक्ती) करतो आणि तुजपाशीच मदत मागतो."

*(दिव्य कुरआन, १:४)*

तुझ्यासोबत आमचा संबध फक्त उपासनेसाठी नसून आम्ही तुझ्याकडून मदतीचीही याचना करतो, कारण साऱ्या विश्वासाचा स्वामी तूच आहे. सर्व शक्तीमान तूच आहे. सुख-समृद्धी सारी तुझीच आहे. आमच्या गरजा तूच पुऱ्या करु शकतो आणि तुझ्याच मदतीवर आमचा पूर्ण विश्वास आहे.

## १७) अल्-ग़ालिबु - प्रभुत्व राखणारा

"आम्ही यूसुफ (अ.) साठी त्या भूभागात पाय स्थिरावण्याचा मार्ग काढला, आणि त्याला व्यवहार आकलनाचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली. अल्लाह आपले काम केल्याशिवाय राहात नाही, परंतु बहुतेक लोक जाणत नाहीत."

*(दिव्य कुरआन, १२:२१)*

जगात माणसाचे सर्व व्यवहार सुरळीत सुरु असते व मनुष्य या भ्रमांत असतो की आपले कुणी वाईट करु शकत नाही. परंतु अचानक असे काही घडुन येते की, संकटे, नैसर्गिक आपत्ती माणसांना नेस्तनाबूद करुन टाकते. कधी अतिथंडी, कधी अधिक ऊन, कधी अधिक पाऊस तर कधी धरणीकंप होऊन जाते. माणूस सर्व शक्ति लावूनसुद्धा आपला बचाव करु शकत नाही आणि शेवटी अल्लाहला शरण येतो व त्याच्यावर श्रद्धा बाळगु लागतो.

## १८) अल्-हफ़िय्यु - अति मेहेरबान

"इब्राहीम (अ.) ने सांगितले, "सलाम आहे तुम्हाला, मी आपल्या पालनकर्त्याजवळ प्रार्थना करीन की त्याने आपल्याला क्षमा करावी."

*(दिव्य कुरआन, १९:४७)*

## १९) अल्-काबिलु, काबिलुत-तौब - पश्चात्ताप स्विकृत करणारा

"गुन्हा माफ करणारा आणि पश्चात्ताप स्वीकारणारा आहे, कठोर शिक्षा देणारा आणि मोठा उदारहस्त आहे, कोणी उपास्य त्याच्याव्यतिरिक्त नाही. त्याच्याकडेच सर्वांना रुजू व्हायचे आहे." *(दिव्य कुरआन, ४०:३)*

ही आशावादी व प्रोत्साहित करणारे विशेषण आहे. अवज्ञा करणारे आपल्या कृत्यावर पुन्हा निरीक्षण करुन माफी मागणाऱ्यांना अल्लाह स्वीकृत करुन माफी देतो. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की बऱ्याच वेळा माफी मागितल्याशिवायही माफी होत असते. माणसाने केलेल्या चांगल्या कर्माच्या मोबदल्यात अपराध माफ होत असतात. परंतु हे फक्त इमानधारकांसाठीच आहे.

- समाप्त -